


RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR




■ Volume - 72 ■ Issue- 115 ■ Marathi Daily ■ Monday 6/5/2024 ■ Pages - 8 ■ Price- Rs. 3

अग्रलेख:
सोन्यातील गुंतवणूक पान २



दादा चौधरीमधील धमाल
उन्हाळी छंद वर्गाचा समारोप पान ७



अरिहंत कॉलेज ऑफ
फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे यश पान ८

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



समोरच्या कॉलनीतले दोघेजण तुमच्याकडून खऱ्या हापूस आंब्यांच्या शेकडो पेट्या खरेदी करत असताना मी गेले दोन महिने पाहायचो... तेव्हाच मला वाटलं होतं की त्या दोघांचा 'क्रिकेट बेटिंगशी' काहीतरी संबंध असणार!!



### सभेची जय्यत तयारी; एक लाख लोकांची बैठक व्यवस्था

# पंतप्रधान मोदींचा झंझावात उद्या नगरात

**समाचार/नगर-दि.६**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विजय संकल्प सभेची जय्यत तयारी महायुतीकडून करण्यात आली आहे. मोदी यांच्या स्वागतासाठी नगर शहर सज्ज झाले आहे. मागील लोकसभा निवडणुकीच्या वेळी याच मैदानावरुन मोदींनी संबोधित केले होते. मोदींच्या सभेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. सभेच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून वाहतुकीचे नियोजन करण्यात आले आहे.

नगर शहरातील निरंकारी भवन शेजारील मैदानावर उद्या (मंगळवारी) दुपारी १ वाजता ही सभा होणार आहे. या सभेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीमधील घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. महायुतीचे उमेदवार खा. सुजय विखे पाटील आणि शिर्डी लोकसभा मतदारसंघातील उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या निवडणूक प्रचारार्थ या महासंकल्प विजय सभेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी मैदानावर भव्य सभामंडप उभारण्यात आला असून, १ लाख लोकांच्या बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. उन्हाची तिव्रता लक्षात घेवून सभामंडपामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या सभेचे नियोजन करण्यात येत असून शहरातील महायुतीचे सर्व पदाधिकारी सभेच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करीत आहेत. यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे शिर्डी येथे महाआवास योजने अंतर्गत घरकुल वितरण कार्यक्रमास तसेच मागील लोकसभा निवडणुकीत डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ दि. १२ एप्रिल २०१९ रोजी आणि निळवंडे धरणातून पाणी सोडण्याचा शुभारंभ करण्यासाठी २६ ऑक्टोबर २०२३ रोजी जिल्ह्यात आले होते. आता चौथ्यांदा पंतप्रधान मोदी यांचा होत असलेला दौरा लोकसभा निवडणुकीच्या निमिताने महत्वपूर्ण असून या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.



### सभेसाठी भव्य व्यासपीठ; १४ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था

भव्य अशा व्यासपीठावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आगमन झाल्यानंतर ते उपस्थितांना मार्गदर्शन करतील. महायुतीच्या वतीने पंतप्रधान मोदी यांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे. ठिकठिकाणी महायुतीचे झेंडे, फ्लेक्स बोर्ड लावून या सभेची वातावरण निर्मिती करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यातून या सभेला नागरिक येणार असल्याचे १४ वेगवेगळ्या ठिकाणी वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे.

## मोदींच्या सभेच्या पार्श्वभूमीवर वाहतूक मार्गात बदल

**समाचार/नगर-दि.६**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उद्या दुपारी शहरातील निरंकारी भवनजवळील मैदानावर सभा होत आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून शहरातील वाहतुकीचे नियोजन करण्यात आले आहे. उद्या दुपारी दोन ते रात्री दहा वाजेपर्यंत शहरातील वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे.

पाथर्डीकडून नगर मार्गे सोलापूर, दौंड, पुणे, मुंबई, मनमाड, छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग असे-चांदबीबी महाल सारोळा व जामखेड रोड, निंबोडी चौक, वाळुंज बायपास, अरणगाव बायपास, केडगाव बायपास, विळद बायपास, शेंडी बायपास. बेल्हेश्वर चौक, महात्मा फुले चौक नागरदेवळे, बुऱ्हाणनगर, वारुळवाडी, गजराजनगर चौक मार्गे. सोलापूरकडून नगरमार्गे पुणे, मुंबई, मनमाड, व छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक ही वाळुंज बायपास, अरणगाव बायपास, केडगाव बायपास, विळद बायपास, शेंडी बायपासमार्गे वळविण्यात आली आहे. दौंडकडुन नगरमार्गे पुणे, मुंबई, मनमाड, व छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या वाहनांकरीता अरणगाव बायपास, केडगाव बायपास, विळद बायपास, शेंडी बायपास मार्गे वळविण्यात आली आहे. पुणे आणि कल्याणकडून नगरमार्गे मनमाड, छत्रपती संभाजीनगर तसेच सोलापूर, जामखेड, पाथर्डीकडे होणारी वाहतूक केडगाव बायपास, विळद बायपास, शेंडी बायपासमार्गे वळविण्यात आली आहे. मनमाड, छत्रपती संभाजीनगरकडून नगर मार्गे कल्याण, पुणे, दौड, सोलापुर, जामखेड, पाथर्डीकडे जाणाऱ्या वाहनांसाठी शेंडी बायपास, दूध डेअरी चौक, विळद बायपास, केडगाव बायपास, अरणगाव बायपास, वाळुंज बायपास, जामखेड रोड, सारोळा बद्दी, चांदबीबी महाल मार्गे वळविण्यात आली आहे.पारीजात चौक येथून बीएसएनल कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर, आनंद विद्यालयाच्या बाजुच्या रस्त्यावरुन **(पान ३ वर)**

### नो व्हेईकल झोन

रेसकोर्स रोड, चुशुल चौक, लाकडी पूल, केंद्रीय विद्यालय, पाथर्डी-नगर रस्ता, न्यायनगर, एसपी चौक, तारकपूर बसस्थानक, तारकपूर चौक, गंगा उद्यान, जॉगिंग पार्क, हरेर मैदान आदी परिसर वाहन विरहित क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आले आहे.

## निवडक

### उध्दव ठाकरेंना भाजपाचे आमदार फोडायचे होते- शिंदे



**मुंबई, दि. ६–** उद्धव ठाकरेंना ५ वर्ष मुख्यमंत्रिपदी बसायचे होते. भाजपाचे संख्याबळ कमी व्हावे, यासाठी १२ जणांना निलंबित केले. भाजपाच्या ४-५ नेत्यांना अटक करायचे प्लॅनिंग होते. भाजपाला घाबरवून २५-३० आमदार फोडायचे पूर्ण प्लॅनिंग तयार होते, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी करत उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, वर्धापनदिनावेळी आईचे दूध विकणारी टोळी आणि बरेच काही भाषण केले. मला राज्यसभा, विधान परिषदेच्या प्रक्रियेतून बाहेर काढले. भाजपाच्या लोकांना आत घालून मलाही संपवण्याचे कटकारस्थान होते, एका गुन्ह्यात माझे खोटे नाव गोवण्याचे सुरू होते, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले. मी सभागृह नेतेपदही मागितले नाही. जेव्हा तो प्रसंग झाला, तेव्हा मला दिघेंनी बोलावून घेतले. माझी मानसिकता नाही, परंतु दिघे यांनी फार आग्रह केला. त्यांचा शब्द मला मोडता येत नव्हता मात्र त्यांनी माझ्यावर विश्वास टाकला, असेही शिंदे यांनी सांगितले. दरम्यान, सिनेमात जे काही दाखवले, राजन विचारे स्वत:हून आले, त्यांनी पद दिले हे खोटे आहे. दुसऱ्या सिनेमात ते खरे दाखवणार आहे. राजन विचारेंना राजीनामा द्यायला सांगितला. परंतु त्यांनी दिला नाही.

### अर्बन बँक गैरव्यवहार प्रकरण

## फिर्याद रद्द करण्यास खंडपीठाचा नकार

**समाचार/नगर-दि.६**



नगर अर्बन बँक गैरव्यवहारप्रकरणी दोषी संचालकांविरोधात कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल फिर्याद रद्द करावी तसेच ठेवीदार संरक्षण कायद्यातंर्गत (एमपीआयडी) कारवाई करू नये, या मागणीसाठी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष राजेंद्र आगरवाल, नवनीत सुरपुरिया यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. या याचिकेवरील सुनावणीत दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने ठेवीदारांच्या बाजूने निकाल देत कोतवाली पोलिस ठाण्यात राजेंद्र गांधी यांनी दिलेली फिर्याद व एमपीआयडी कायदा लागू राहणार असे स्पष्ट केले आहे, अशी माहिती राजेंद्र चोपडा यांनी दिली. न्यायालयाच्या या निर्णयाचे राजेंद्र चोपडा यांनी स्वागत केले आहे. सर्वसामान्य गोरगरीब ठेवीदारांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे म्हटले आहे. तसेच आता पोलिसांनी सखोल तपास करून दोषी अधिकारी, संबंधित संचालकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी चोपडा यांनी केली आहे.

त्यांनी म्हटले की, नगर अर्बन बँकेतील घोटाळ्याप्रकरणी बँक बचाव कृती समिती तसेच जागृत सभासद सातत्याने कायदेशीर मार्गाने पाठपुरावा करीत आहेत. आज न्यायालयाने दिलेला निकाल अतिशय महत्वपूर्ण आणि ठेवीदारांसाठी दिलासादायक आहे. बँकेत स्पष्टपणे प्रचंड मोठा गैरव्यवहार तत्कालीन अध्यक्ष स्व. दिलीप गांधी व त्यांच्या सहकारी संचालकांनी केला. यात काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनीही त्यांना साथ दिली. असा आरोप राजेंद्र चोपडा यांनी करत म्हणाले की, असे असताना गुन्हाच रद्द होण्यासाठी न्यायालयात धाव घेणे चुकीचे होते. आता न्यायालयाने त्यांना चपराक मारली आहे. बँकेचा बँकिंग परवाना आधीच रद्द झालेला आहे. अशा परिस्थितीत आता दोषी अधिकारी, संचालकांवर कायद्याने कारवाई अटळ आहे.

### बाळासाहेब थोरात, अमोल कोल्हे यांच्यावरही साधला निशाणा

# शरद पवारांनी बारामतीच्या बाहेर काय केले- मंत्री विखे

**समाचार/नगर-दि.६**

शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांना केंद्रातही मंत्रीपद मिळाले. बारामतीच्या बाहेर जावून त्यांनी काय केले? असा सवाल उपस्थित करीत नगर जिल्ह्यात आलेले उद्योग ही पवारांची मेहेरबानी नाही, अशी टीका महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेच्या तयारीचा आढावा मंत्री विखे पाटील यांनी घेतला. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी शरद पवार यांच्यावर निशाणा साधला. शरद पवार यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर बोलावे हेच मुळात दुर्दैव आहे. मोदी यांच्या सहकार्यामुळेच शरद पवारांचे राजकीय अस्तित्व टिकून आहे.



विखे पाटलांनी काय केले, हे शरद पवारांना सांगण्याची गरज नाही. या जिल्ह्यातून आठ वेळा बाळासाहेब विखे पाटील यांना संसदेत प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. मलाही सात वेळा जनतेने निवडून दिले. ही आमच्या कामाची पावती आहे. शरद पवार यांचे जिल्ह्यासाठी काय योगदान आहे, हे त्यांनी एकदा सांगावे असे आव्हान विखे पाटील यांनी दिले. शदर पवार यांचे कर्तृत्व काय हे राज्यातील आणि देशातील जनतेने पाहिले आहे. बारामतीच्या बाहेर ते काहीही करु **(पान ३ वर)**

### शेअर बाजारात चांगल्या परताव्याचे आमिष

## व्यावसायिक व नोकरदाराची ७६ लाखाची फसवणूक

**समाचार/नगर-दि.६**

शेअर बाजारात गुंतवणूक करून त्या बदल्यात चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवत एका व्यावसायिकाची तब्बल ४६ लाख रुपयांची व एका नोकरदराची ३० लाख रुपयांची अशी एकूण ७६ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी राजेंद्र जगन्नाथ ससाणे (वय ५३, रा. सारसनगर) व श्रीकांत ज्ञानदेव तवले (वय ३१, रा. जेऊर, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फसवणूक व ठेवीदार संरक्षण कायद्यानुसार (एमपीआयडी) दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

निकेश सुरेश शिंदे (रा. पिंपळगाव माळवी, ता. नगर) याच्या विरोधात हा गुन्हा दाखल झाला आहे. निकेश शिंदे याने ससाणे यांना शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा देण्याचे आमिष दाखविले. त्याच्यावर विश्वास ठेऊन २० डिसेंबर २०20 ते १३ नोव्हेंबर २०२१ या काळात ससाणे यांनी शिंदे याला वेळोवेळी ४६ लाख रुपये त्याच्या खात्यावर जमा केले. तसेच, तवले यांनीही शिंदे यास वेळोवेळी **(पान ३ वर)**

### प्रतिव्यक्ती पाण्याची मागणी वाढणार

# २०५० पर्यंत देशातील अनेक भागात गंभीर जलसंकट!

**नवी दिल्ली, दि. ६–** हवामान बदलामुळे बदललेले ऋतुचक्र, भूगर्भातील पाण्याचा वारेमाप उपसा, जलपुनर्भरणाकडे होणारे जाणीवपूर्वक दुर्लक्ष यामुळे २०५० पर्यंत भारतातील निम्म्याहून अधिक देशांमध्ये गंभीर जलसंकट निर्माण होण्याची शक्यता आहे. कृषीक्षेत्रातील जलसंधारण क्षमता वाढविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या एका अहवालात हा धक्कादायक इशारा देण्यात आला. त्यामुळे पुढील २५ वर्षांमध्ये भारतातील प्रतिव्यक्तीच्या पाण्याच्या मागणीत मोठी वाढ होणार आहे.

देशात शेतीसाठी सर्वाधिक प्रमाणात पाणी वापरले जाते. भारतात उपलब्ध पाण्याचा ८० ते ९० टक्के हिस्सा शेतीसाठी वापरण्यात येतो. त्यानंतर घरगुती तसेच औद्योगिक कारणांसाठी पाण्याचा उपयोग



केला जातो. तांदूळ, गहू, ऊस या तीन पिकांसाठी सर्वाधिक पाणी वापरले जाते. शेतीसाठी पाणी नीट वापरले गेले तर २० टक्के पाण्याची बचत होऊ शकते, असेही या अहवालात म्हटले आहे.

वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत अत्यल्प प्रमाणात असलेल्या जलस्रोतांमुळे भारतात पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होणार नाही. ७६ टक्के लोकांकडे पुरेसे पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे देशापुढे पाणी टंचाईचे भीषण संकट निर्माण होण्याची भीती असल्याचे अहवालात म्हटले आहे. जगातील एकूण लोकसंख्येपैकी १७ टक्के लोक भारतात राहतात. जगातील एकूण पाणीसाठ्यापैकी केवळ ४ टक्केच पाणी भारतात उपलब्ध आहेत. प्रति व्यक्ती १,७०० क्युबिक मीटरपेक्षा कमी पाणी उपलब्ध असेल तर त्या भागात पाण्याचे गंभीर संकट उभे ठाकले आहे, असे फ्लेंकेनमार्क इंडेक्समध्ये म्हटले आहे.

संपादकीय

# वादातीत परिणामकारकता

करोना लसीच्या दुष्परिणामांचा विषय अलिकडे पुन्हा डोके वर काढून गेला. कोविशिल्ड या लसीच्या वापराने काही गंभीर धोके उद्‌भवू शकत असल्याचे खुद्द लसनिर्मिती करणाऱ्या कंपनीने मान्य केल्यामुळे ऐन उन्हाळ्यात शंकेचे ढग दाटून आले नसते तरच नवल. साहजिकच या लसीचे दुष्परिणाम नेमके कोणते, त्याची लक्षणे कोणती आणि लस घेणाऱ्यांच्या जीवाला धोका उद्‌भवण्याची शक्यता नेमकी किती याविषयी लोकांचे अनेक प्रश्न आहेत.जगातील अनेक कंपन्यांनी करोनावर लस बनवली आहे. त्यापैकी एक म्हणजे एस्ट्राजेनेका ही कंपनी. कोविशिल्ड नावाची करोना प्रतिबंधक लस तयार करणाऱ्या याच एस्ट्राजेनेकाने अलिकडेच कबूल केले की आपल्याकडून निर्मित लसीमुळे लोकांवर काही दुष्परिणाम होऊ शकतात. यामुळे रक्त गोठण्याची शक्यता असल्याचे कंपनीने म्हटले. भारतातील लोकांना करोना लसीचे सुमारे दोन अब्ज २१ कोटी डोस देण्यात आले आहेत. भारतातील तब्बल ९३ टक्के लोकांना करोनाची लस देण्यात आली आहे. त्याच वेळी जगात या लसीचे दोन अब्ज ५० कोटीपेक्षा जास्त डोस वितरित केले गेले आहेत. २०२१ मध्ये युरोपियन मेडिसिन एजन्सीने एस्ट्राजेनेकाच्या लसीमुळे २२२ लोकांमध्ये रक्त गोठल्याची तक्रार असल्याचा अहवाल दिला होता. म्हणजेच त्या वेळी लाखातील एकाला हा धोका होता. तेही युरोपियन देशांमध्ये हे प्रमाण बघायला मिळाले होते. रक्त गोठण्याच्या समस्येबाबत भारतालाही माहिती होती आणि त्यावर देखरेख करण्यात आली होती, असे आता सांगितले जात आहे. मात्र, फायद्याचा आकडा मोठा आणि तोटा नगण्य असल्यामुळे त्यावर त्यावेळी फारसे भाष्य केले गेले नाही. आता मात्र नव्याने हा विषय ऐरणीवर आला.करोनाची लस घेतल्यानंतर किती काळ वेदना होऊ शकतात, असे त्यावेळी सांगण्यात आले होते. कोणतीही लस दिल्यानंतर हे दुष्परिणाम समोर येतात. साहजिकच या मानसिकतेतून त्यावेळी लोकांनी छोट्या मोठ्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले. कारण लसीकरणानंतरच्या काही घटना या धोक्याचे स्पष्ट निर्देश देत होत्या. त्याचप्रमाणे, भारत सरकारने दीर्घकाळ करोना लसीकरणाचे निरीक्षण केल्याचेही समोर येत होते. त्यांनी यासंबंधीचे पोर्टल तयार केले. समिती स्थापन केली. हे वेळोवेळी पाहायला मिळाले. मात्र आता भारतात दिल्या गेलेल्या कोविशिल्ड लसीपुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. तज्ज्ञांच्या मते, त्याचा इतका दीर्घ परिणाम होत नाही. कोणतीही समस्या उद्‌भवल्यास एक तर लस दिल्यानंतर लगेच दिसून येते किंवा महिना दीड महिन्यांनंतर परिणाम दिसू लागतो. प्रभाव दिसत असला तरी भारतात लसीकरणानंतर त्रास होण्याची टक्केवारी ०.००७ टक्के आहे. त्यामुळे आता घाबरण्यासारखे काही नाही.भारत सरकारने करोना लस बाहेर आल्यानंतर एईएफआय पोर्टल तयार केले. यासोबतच एईएफ समितीही स्थापन करण्यात आली. या समितीने शेवटचा अहवाल मे २०२२ मध्ये सादर केला होता. हा अहवाल करोनाची लस घेतल्यानंतर गुंतागूंत झाल्याची तक्रार करणाऱ्यांबद्दल होता. त्यामुळे समस्या फक्त कोविशिल्डचीच नाही तर स्पुटनिक, कोवॅक्सिनबद्दलही होती. या लसी घेतल्यानंतर लोकांनी तक्रार केली होती. आताही इंटरनेटवर गेल्यानंतर की वर्ड टाकून ही कागदपत्रे पाहता येतात. या पार्श्वभूमीवर धोका व्यक्त करण्यात आलेली रक्त गोठण्याची समस्या नेमकी काय आहे, हेदेखील समजून घ्यायला हवे. रक्ताच्या गुठळ्या होण्याच्या स्थितीला थ्रोम्बोसिस म्हणतात आणि ही स्थिती शरीरात कोठेही निर्माण होऊ शकते. शिरा, धमन्या किंवा हृदयाच्या आतदेखील रक्ताच्या गुठळ्या होऊ शकतात. त्यामुळे शरीरातील अवयवांमध्ये रक्त नीट जात नाही. स्वाभाविकच संबंधित अवयवांचे काम बाधित होते आणि आरोग्यविषयक गंभीर समस्या निर्माण होतात. रक्त गोठणे टाळण्यासाठी जीवनशैलीत काही बदल केले जाऊ शकतात. थ्रोम्बोसिसमुळे हृदयविकाराचा झटका, ब्रेन स्ट्रोक आणि प्लेटलेट्स कमी होण्याचा धोका वाढतो.कोविशिल्डबद्दलच्या अशा तक्रारी आधीच अवगत होत्या. तथापि, फायद्याच्या तुलनेत नुकसानाची टक्केवारी खूपच कमी होती. किंबहुना, ती नगण्य मानली गेली होती. त्यामुळेच ही लस देणे सुरू ठेवण्यात आले. सीरम इन्स्टिट्यूटच्या म्हणण्यानुसार लस घेतल्यानंतर चक्कर येण्याची समस्या येऊ शकते. याशिवाय हृदयाचे ठोके बदलणे, श्वास घेण्यास त्रास होणे किंवा श्वास घेताना शिट्टीचा आवाज येणे अशी समस्या असू शकते. ओठ, चेहरा किंवा घसा सुजण्याची समस्यादेखील दिसू शकते. कंपनीचे म्हणणे आहे की लसीकरणानंतर एकाच वेळी एकापेक्षा जास्त दुष्परिणामही दिसू शकतात. यामध्ये स्नायू किंवा सांधे दुखणे, डोकेदुखी यांचा समावेश होतो. या स्थितीत डॉक्टरांचा सल्ला घेण्याची विनंती कंपनीने दिला आहे. अर्थात या समस्या दहापैकी एकाला होऊ शकतात, असेही कंपनीचे म्हणणे आहे. कंपनीने असेही म्हटले आहे की इंजेक्शनच्या ठिकाणी सूज किंवा लालसरपणा येणे; ताप, उलट्या किंवा जुलाब, हात आणि पाय दुखणे किंवा खूप ताप येणे, घसा खवखवणे, नाक वाहणे, खोकला किंवा थरथरणेदेखील होऊ शकतो. त्यामुळे अशी लक्षणे दिसल्यास कोणत्याही प्रकारची लस घेतल्यानंतर घाबरुन जाण्याचे कारण नाही. ही सगळी लक्षणे तात्पुरती असतात. कोणताही उपचार न घेता काही दिवसांमध्ये ती कमी होतात. अर्थातच लक्षणांची तीव्रता बराच काळ जाणवत असतील तर डॉक्टरांची मदत घ्यायलाच हवी.

## कला सन्मान पुरस्काराने राजेंद्र टाक सन्मानित



**समाचार/नगर-दि.६**

शहरातील प्रथितयश गायक, निवेदक राजेंद्र टाक यांना आर्ट बिट्स महाराष्ट्र कडून राज्यस्तरीय कला सन्मान पुरस्कार २०२३-२४ नुकताच प्राप्त झाला आहे. पुण्यातील हा प्रतिष्ठेचा पुरस्कार केवळ महाराष्ट्रातील कलाकारांना दिला जातो.

एका सर्वेक्षणातून गेली ३३ वर्ष कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना गौरविण्यात आले आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण गायन आणि निवेदन शैलीमुळे त्यांचा शहर आणि जिल्ह्यातही मोठा चाहतावर्ग आहे. नवनवीन कार्यक्रमाची निर्मिती आणि राबवत असलेल्या उपक्रमामुळे टाक नेहमीच चर्चेत असतात. अध्यात्मिक सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात देखील ते आपले योगदान देत असतात.

अनेक पुरस्कारांनी त्यांना यापूर्वी सन्मानित करण्यात आले आहे. राज्य शासनाने देखील त्यांना विशेष कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्त केले आहे. सन्मानपत्र, गोल्ड मेडल आणि स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. संस्थेचे पुण्यातील अधिकारी संतोष पांचाल यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

## बालरोग तपासणी व उपचार शिबिरास प्रतिसाद

**समाचार/नगर-दि.६**


अहमदनगर होमिओपॅथीक शिक्षण संस्थेचे अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल सावेडी रोड, येथे सोमवार दि. २२ ते २७ एप्रिल दरम्यान आयोजित बालरोग तपासणी व उपचार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराचे उद्‌घाटन डॉ. ज्योती तांबे यांच्या हस्ते व समारोप डॉ. मिनल सोले यांच्या उपस्थितीत झाले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य व रुग्णालयीन अधीक्षक डॉ. सुनील पवार यांनी दिली. ४६ रुग्णांनी सदर शिबिराचा लाभ घेतला. या सर्व रुग्णांना व यापुढेही येणाऱ्या सर्व रुग्णांना मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. रुग्णांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. भूषण अनभुले, उपाध्यक्ष भूषण चंगेडे व इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## मेंदूची कार्यप्रणाली

नमस्कार वाचकहो!

मागच्या भागातील माहिती महत्वाची तर होतीच पण ती खूपच कमी आहे. खरतर आपला कणा आणि आपले सांधे हे आपल्या संपूर्ण आयुष्यावर भला मोठा परिणाम करीत असतात. पुढे जाण्यासाठी आपल्याला काही मानसिक बाबी व विचारांच्या प्रक्रिया यावर लक्ष केंद्रित करायचे आहे.




आजचा विषय आहे आपल्या मेंदूतील विचारांचा एक तरंग!

दिवसभरात एक व्यक्ती कित्येक हजार विचार डोक्यात आणते. त्यापैकी बहुतांश तुमच्या न कळत येणाऱ्या असतात. तशी आपल्या मेंदूची शक्ती अपार आहे. ज्याचे मोजमाप करणे कठीण आहे. पण योगशास्त्राच्या आधारे आता हे आधुनिक शास्त्रही मानू लागले आहे की चित्तामध्ये एका वेळी वृत्तीचा (विचाराचा) एक तरंग उठतो आणि त्या क्षणाला तोच विचार प्रामुख्याने कार्यरत असतो. म्हणजे जरी हजार विचारांची गर्दी होत असेल तरी ॲक्शन घेण्यासाठी एकच प्रबळ दावेदार असतो.

जेव्हा आपल्या विचारांची दिशा आणि दशा ठरते किंवा ठरविली जाते तेव्हाच हे माहिती होते की आपल्या वर्तनामध्ये कोणता परिणाम जाणवणार आहे, इष्ट की अनिष्ट. याचा अर्थ आपल्या वर्तनाचा पहिला पाया आपला विचार होय. म्हणून असे मानले जाते की, ज्या व्यक्तीचे एखाद्या विचाराचे मूळ सुखी, आनंदी आणि सकारात्मक असते, त्या व्यक्तीकडून होणारी कृती किंवा घडणारी घटना किंवा त्याचे बोलणे, वागणे हे नक्कीच जास्त चांगले, योग्य आणि सकारात्मकतेकडे वाटचाल करणारे असेल किंवा होणारा तोटा किंवा हानी ही कमीत कमी असेल. आपले या विचार प्रणालीवर नियंत्रण असायला हवे.

कसे ते पाहू या.

१) सर्वप्रथम खूप भारंभार कामे एकत्रित किंवा एकावेळी करण्याचा प्रयत्न करु नका.

२) आपले प्राधान्य रोज पहा आणि त्यानुसार कामाचे नियोजन करा.

३) मेंदू शिणलेला असताना त्याला नवा विचार देऊ नका. अन्यथा निराशा येईल.

४) अर्थपूर्ण विचार आणि निरर्थक विचार यांची वेगळी यादी असावी.

५) न आवडणाऱ्या विचारांवर स्वतःला किंवा दुसऱ्याला प्रतिक्रिया देणे टाळा.

६) वरील सर्व बाबी साध्य करण्यासाठी खालील उपचार पध्दतीचा अवलंब करा.

* रोज सकाळी लवकरात लवकर उठा
* सकाळी ध्यानधारणा, ओंकार जप आणि योगसाधना करायलाच हवी.
* निसर्गाच्या सानिध्यात काही काळ नक्की घाला. त्यामुळे मनाला गारवा मिळतो आणि मेंदू ताजातवाना होतो.
* चांगल्या विचारांची प्रबलता वाढविणे आणि चुकीच्या किंवा बिनकामाच्या विचारांना दुर्लक्षित करणे, ही सवय बनवा.

**- डॉ. शामा मंत्री**
समुपदेशक
मो. न. ९८९०९९५४११




### राशीभविष्य

- **मेष** : किरकोळ बाबींचा ताण राहील. प्रवासामुळे दगदग होईल. जुनी येणी वसुलीबाबत अडचणी येतील.
- **वृषभ** : जबाबदाऱ्या विचारपूर्वक घ्याव्या. अतिआत्मविश्वास अडचणीचा ठरेल. विचारानं रहायला हवं.
- **मिथुन** : मुलांबाबत चिंता राहील. कौटुंबिक वाद-विवाद संभवतात. नोकरीत प्रगतीच्या संधी लाभतील.
- **कर्क** : कलाकारांचा गौरव होईल. स्थापत्य क्षेत्रात विशेष अनुकूलता राहील. परदेश प्रवासाचे योग आहेत.
- **सिंह** : आठवणींना उजाळा मिळेल. स्थावर प्रश्नात लाभ होईल. नव्या ओळखीतून दिलासा मिळेल.
- **कन्या** : गृहसजावटीच्या क्षेत्रात प्रगती होईल. मोठ्या खरेदीचा उत्साह राहील. मुलांची उत्तम प्रगती होईल.
- **तूळ** : आर्थिक प्रश्नांचा ताण राहील. सरकारी कामं मार्गी लागतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी.
- **वृश्चिक** : हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल. उत्साहवर्धक घटना घडतील. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.
- **धनु** : व्यवसायात अडचणी संभवतात. अनुभवींचा सल्ला घ्यावा. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं.
- **मकर** : कलाकारांचा उत्साह वाढेल. संधी चालून येतील. स्थावर प्रश्नात तडजोड करावी लागेल.
- **कुंभ** : अडचणींवर धैर्यानं मात कराल. आमिषाला बळी पडू नका. विवाहकार्य लांबणीवर पडेल.
- **मीन** : भावंडांशी मतभेद संभवतात. छोट्या-मोठ्या प्रश्नांचा ताण राहील. प्रवासात काळजी घ्यावी.


### दिनविशेष

**७ मे**

- **२००२** : लोकसाहित्याच्या संशोधक दुर्गाबाई भागवत यांचे निधन.
- **२०१३** : स्थानिक संस्था कराच्या वादावर तोडगा निघालेला नसल्याने व्यापाऱ्यांची बंदची हाक.
- **२०१७** : फ्रान्सच्या अध्यक्षपदासाठी इमॅन्युएल मॅक्रॉन यांना कौल.
- **२०१८** : आगामी सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस सर्वात मोठ पक्ष म्हणून उदयाला आल्यास आपण पंतप्रधान होण्यास तयार असल्याचं राहुल गांधी यांचं प्रतिपादन.

### आरोग्यमंत्र — सकारात्मक विचार करा

दंतवैद्यांची, डेंटल क्लिनिकमधील वातावरणाची भीती असणं यालाच डेंटल फोबिया किंवा एंग्झायटी म्हणतात. अशी भीती निर्माण होण्यामागे अनेक कारणं आहेत. आधीच्या वेदनादायी अनुभवानंतर पुन्हा असा अनुभव घेताना भीती वाटू शकते. असुरक्षिततेची भावना, उपचारासाठी खुर्चीवर बसल्यानंतर वाटणारी भीती, स्वत:वर नियंत्रण न राहणं, तोंड उघडताना वाटणारी अस्वस्थता, ओशाळलेपण यामुळे अशी समस्या निर्माण होऊ शकते. डेंटिस्टकडे जाण्याआधी अस्वस्थ वाटणं, झोप न येणं, डॉक्टरकडे गेल्यानंतर ताण येणं, निराश, हताश वाटणं, डेंटिस्टकडे जाण्याआधी आजारी असल्यासारखं वाटणं, दातांची तपासणी होत असताना भीती वाटणं आणि श्वास घ्यायला त्रास होणं ही या त्रासाची लक्षणं मानता येतील. या विकारावर उपचार शक्य आहेत. आपली भीती दंततज्ज्ञाकडे व्यक्त करा. दातांच्या उपचारांविषयी डेंटिस्टशी बोलून घ्या. उपचारांदरम्यान लक्ष दुसरीकडे वळवा. गाणी ऐका, तीव्ही बघा. वेदना कमी करण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी वेदनाशामक औषधं घेता येतील. याविषयी दंततज्ज्ञाशी बोला. ताण निवारणाच्या उपाययोजना करा. डेंटिस्टकडे जाण्यापेक्षा दातांच्या वेदना सहन करणं तुम्हाला अधिक योग्य वाटत असेल तर मानसोपचारतज्ज्ञाची मदत घ्या. उपचारानंतर दूर होणाऱ्या वेदनारहित आयुष्याचा विचार करा. सकारात्मकतेने ही भीती दूर सारा.



### महत्त्वपूर्ण काही — इथेही आहे अंधश्रद्धा

इटलीची राजधानी रोममध्ये एक कारंजं आहे. या कारंज्यात पैसे टाकले की रोमला पुन्हा येण्याची आपली इच्छा पूर्ण होते, असं इथले लोक मानतात. या कारंज्यात दिवसभरात जवळपास ३०० युरो जमा होतात. म्हणजेच अडीच लाख रूपये. प्रत्येक वर्षी या कारंज्यात नऊ कोटी रूपये जमा होतात. हे ऐकून तुम्हाला धक्का बसला असेल. खरी गंमत पुढेच आहे. दिवसभरात एकदा हे कारंजं बंद केलं जातं आणि सगळे पैसे काढून घेतले जातात. गरीबांच्या खानपानाची व्यवस्था करण्यासाठी हे पैसे वापरले जातात. रोममधल्या ट्रेवी या शहरात हे कारंजं आहे. हे कारंजं ८५ फूट उंच आणि १६१ फूट रूंद आहे. आर्किटेक्ट निकोलस साल्वी यांनी या कारंज्याची रचना केली आहे. १७६२ मध्ये हे कारंजं बांधून पूर्ण झालं. इथे येणारा प्रत्येक पर्यटक इथे नाणं टाकतो. नाणं टाकल्यानंतर रोमला पुन्हा येण्याची इच्छा पूर्ण होईल, असं लोकांना वाटतं. कारंज्याच्या दिशेला पाठ करून मग नाणं टाकायचं आहे. नाणं योग्य ठिकाणी पडलं तरच रोमला परत येता येईल. आहे ना गंमत!

### सल्ला मोलाचा — कलाकृती टाकाऊ वस्तूंच्या

सतत सुरू असणाऱ्या खरेदीमुळे घरात सामानाची भरताड होते आणि अनेक गोष्टी अडगळीत जाऊन पडतात. अशा वेळी त्यातूनच काही सुंदर वस्तू बनवण्याचा उपाय योजायला काय हरकत आहे? यामुळे कलात्मकतेला वावही मिळेल आणि स्वत:च्या हाताने घर सजवल्याचं समाधानही मिळेल. ✻ सुंदर आणि वैविध्यपूर्ण आकाराच्या बाटल्या स्वच्छ करुन आकर्षक पारदर्शक रंगाने रंगवून घ्या. आता त्यांना रेशमी डोर लावून टांगून ठेवा. यात तुम्ही मेणबत्त्या ठेऊ शकता अथवा छोटसं रोपही लावू शकता. ✻ मॅग्नेटिक स्टीक नोट बनवण्यासाठीही बेकिंग शीट उपयोगात येते. बेकिंग शीट हलकीशी सजवा आणि सर्व्हिंग ट्रे म्हणून उपयोगात आणा. यापासून तुम्ही ज्वेलरी अथवा मेकअप आयटम होल्डर देखील बनवू शकता. ✻ घरात सोड्याचे रिकामे कॅन साठले असतील तर ते पेन्सिल अथवा पेन होल्डरचं काम करू शकतील. कॅन मध्यात कापा. त्याच्या धारदार कडा मुडपून घ्या. आकर्षक पेपर अथवा रंगाने कॅन सजवा. ✻ सध्या पेपर बॅग्जच्या वापराला प्राधान्य दिलं जात आहे. या बॅग्ज तयार करण्यासाठी घरातल्या रद्दीचा वापर करा. यासाठी मुलांचं साहाय्य घ्या.

### पंचांग

**मंगळवार, ७ मे २०२४**

क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६, चैत्र कृ. १४, नक्षत्र : अश्विनी, चंद्रराशी : मेष, आयुष्यमान योग

सूर्योदय : ६.१०, सूर्यास्त : ७.०१

### फॉरवर्डस

**कधी कधी आपणचं आपल्याला दोष देत राहतो. कवी म्हणतो...**

नजरअंदाज करने कि कुछ तो वजह बताई होती,

अब मैं कहाँ कहाँ खुद में बुराई ढूंढू?

### टेक्नो टॉक

दोस्तांनो, आपला स्मार्टफोन कधीही हरवू शकतो. स्मार्टफोन हरवल्यावर काय करायला हवं याविषयी. ✻ सर्वात आधी तुमचं सिम कार्ड ब्लॉक करून घ्या. पोलिसात तक्रार नोंदवा. ✻ स्मार्टफोनचा वापर वेगवेगळ्या कामांसाठी केला जातो. यात आपले पासवर्ड सेव्ह केलेले असतात. पासवर्ड सतत बदलत रहावं. बँकिंगसंबंधीची माहिती यात सेव्ह करू नये. ✻ फोनमध्ये नेहमी पासवर्ड टाकून ठेवावा. फिंगरप्रिंट स्कॅनिंगसारखे ऑप्शन ऑन करून ठेवावेत. ✻ फोनमधले कॉन्टॅक्ट्स ऑनलाईन स्टोरेज सर्व्हिसवर लिंक, सेव्ह करून ठेवा.

### करिअरवाटा — मदत स्पेशलाईज्ड कोर्सेसची

कोणत्याही कंपनीचं कामकाज विविध विभागांमध्ये चालतं आणि त्यासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. विविध विभागांसाठी विक्री व्यवस्थापक, मनुष्यबळ, वित्तीय व्यवहार, नियोजन अशा व्यवस्थापकांची आवश्यकता असते. परंतु प्रत्येक शाखेशी निगडित स्पेशलाईज्ड अभ्यासक्रम पूर्ण केलेले व्यवस्थापक मिळतातच असं नाही. शिवाय एवढे व्यवस्थापक नेमणं कंपनीला शक्य होतंच असं नाही. त्यामुळे एकाच व्यवस्थापकावर सगळ्या विभागांचं काम सोपवलं जातं. अशी कायपद्धती असल्यामुळेच काही वेळा आय.टी.मध्ये तज्ज्ञ असणाऱ्या व्यवस्थापकाला अकौंटस्चं काम बघावं लागतं. याचाच विचार करूनच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट कोझिकोडे या संस्थेनं स्वतंत्र मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅम तयार केला. या प्रोगॅममध्ये सध्या कामावर असलेल्या, अकौंटस्चं प्रशिक्षण न घेतलेल्या परंतु ते काम करावं लागणाऱ्या व्यवस्थापकांना प्रवेश दिला जातो. त्यांना इंडियन फिनान्शियल मार्केट, टाईम व्हॅल्यू ऑफ मनी, अंडरस्टँडींग फिनान्शियल स्टेटमेंट, कॅपिटल बजेटिंग, ब्रेक इव्हन ॲनेलिसीस, बजेटरी कंट्रोल आणि स्टँडर्ड कॉस्टिंग आदी विषयांचं ज्ञानही दिलं जातं.



### खेचाखेची — गळा कापतो...

एक शिंपी बसमध्ये चढला. सीटवर बसताच त्याला एक फोन आला. फोनवर तो मोठमोठ्याने बोलत होता...

.

हे बघ तू हात कापून ठेव. मी येतो आणि पटकन गळा कापतो.

.

खरं सांगतो... दुसऱ्या क्षणी सगळी बस रिकामी झाली.

### वेगळं काही

अमेरिकेत राहणाऱ्या नेट सिगॉर्डकरने पत्नीला आश्चर्याचा धक्का देण्यासाठी अनोखी पद्धत शोधून काढली. त्याने आकर्षक आणि बोलणाऱ्या टॅटूचा शोध लावला. याला साउंड वेव्ह टॅटू असं म्हटलं जातं. या टॅटूचा आवाज ऐकण्यासाठी ॲपचा वापर करावा लागतो. अशाप्रकारचा टॅटू बनवण्यासाठी साउंड ट्रॅकचा प्रभावी वापर करता येतो. यानंतर स्कीन मोशन ॲप स्कॅन केल्यानंतर टॅटू बोलू लागतो. एखादा मेसेज, गाणं किंवा कोट त्याचं भाष्य असतं. तंत्रज्ञानामुळे अनेक गोष्टी शक्य झाल्या आहेत. आवाज काढणारा टॅटू हा त्याचाच एक भाग.

### भटकंती — खारे पाणी केसांसाठी घातक

सुट्टीतील भटकंती म्हणून अनेकजण बीचची निवड करतात. समुद्रात मनसोक्त डुंबलं जातं. दंगामस्ती होते. पण समुद्रस्नानामुळे केसांचा पोत बिघडतो. ते टाळण्यासाठी सोप्या ट्रिक्स वापरून केसांची काळजी कशी घ्यावी हे जाणून घ्या.

✻ समुद्रकिनारी वास्तव्य असेपर्यंत एक दिवसाआड केसांचं कंडिशनिंग करावं. धूळ, ऊन आणि रेतीमुळे केस कोरडे होतात. हे लक्षात घेता केसांवर हेअर मास्कचा वापरही करता येऊ शकतो. ✻ समुद्रात जाण्यापूर्वी केस साध्या पाण्याने ओले करून घ्यावेत. त्यामुळे केसांकडून खारं पाणी कमी प्रमाणात शोषलं जाईल. ✻ बीचवर जाताना स्कार्फ आणि हॅटचा वापर करणं गरजेचं ठरतं. त्यामुळे केसांचं नुकसान टाळणं शक्य आहे. ✻ बीचवर दिवसभर उन्हात राहिल्यानंतर केसांवर ड्रायरचा वापर करणं योग्य नाही. ब्लो ड्रायरने सुकवण्याऐवजी केस नैसर्गिकरित्या वाळवावेत. ✻ बीचवर जाताना केसांसाठी कुठलं प्रॉडक्ट योग्य ठरेल याचा अंदाज घ्या. केसांसाठी अँटी फ्रीजिंग प्रॉडक्ट आणि सन प्रोटेक्शन शँपूचा वापर करा. सीरमचा वापरही लाभदायक ठरेल.



Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

# समाचार

सोमवार, दि. ६ मे २०२४ पान ३


स्वीप समितीच्या प्रयोगाचे कौतुक

# व्हीआर डोळ्याला लावून घरूनच फिरता येणार मतदान केंद्रामध्ये



**समाचार/नगर-दि.६**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या निर्देशानुसार अहमदनगर व शिर्डी लोकसभा निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढण्यासाठी डॉ .अमोल बागुल, जिल्हा मतदारदूत यांच्या संकल्पनेतून मतदानाला जाण्याअगोदरच मतदान केंद्राच्या आतील रचना व मतदान प्रक्रियेचा क्रम समजण्यास सुलभ व्हावा म्हणून व्हीआर बॉक्स डोळ्याला लावत घरी बसून मतदान केंद्रामध्ये फिरता येणार आहे.

अहमदनगर जिल्हा स्वीप समितीच्या मतदान प्रक्रियेत आभासी वास्तविकता तंत्रज्ञानाच्या प्रयोगाचे राज्य व देश पातळीवर कौतुक होत आहे. मतदान केंद्राचा एक मिनिटाचा थ्रीडी व्हिडिओ गुगल- मायक्रोसॉफ्ट व पल टीचर डॉ.बागुल यांनी तयार केला आहे. तो मोबाईलमध्ये लावून व्हीआर बॉक्स व गिअरच्या माध्यमातून आपण बसल्या जागी मतदान केंद्राच्या आतील प्रवेश,मतदान अधिकारी यांचे कार्य तसेच वोटिंग कंपार्टमेंट, व्हीव्हीपॅट मशीन व निर्गमन प्रवेशद्वार आदी मतदानाच्या क्रमिक प्रक्रिया लहान मुलांपासून ते थोरांपर्यंत सर्वांना जणू मतदान केंद्रातच आपण उभे आहोत की काय, या पद्धतीने पाहता येणार आहेत. ग्रामीण भागातील सर्वसामान्य मतदारांना मतदानाची प्रक्रिया सहज सोपी सुलभ होऊन मतदान टक्केवारीत वाढ व्हावी म्हणून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

शक्ती सिंग, ममता सिंग, (निवडणूक निरीक्षक), अजय कुमार बिष्ट (निवडणूक निरीक्षक ),एम. व्ही.जया गौरी (निवडणूक निरीक्षक ), बाळासाहेब कोळेकर (अपर जिल्हाधिकारी ), राकेश ओला ( जिल्हा पोलीस अधीक्षक ),आशिष येरेकर( मुख्य कार्यकारी अधिकारी) यांच्या स्वीप आढावा बैठकीत अशोक कडूस (स्वीप नोडल अधिकारी)यांनी व्हीआर बॉक्स मधून मतदान केंद्राचे दर्शन हे प्रात्यक्षिक सादर केले.

देवळाली प्रवरा नगरपरिषदेत सेल्फी विथ व्होट स्पर्धा

## मताचा टक्का वाढविण्यासाठी अभिनव उपक्रम

**समाचार/नगर-दि.६**

वाढत्या उष्णतेमुळे मतदारराजा मतदानाकडे पाठ फिरवत असल्याने देवळाली प्रवरा नगरपरिषदेने मतदारांमध्ये जनजागृती व्हावी आणि जास्तीत जास्त प्रमाणात मतदान व्हावे, यासाठी सेल्फी विथ व्होट स्पर्धा व शहरस्तरीय लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मतदान स्पर्धा आयोजित करून आकर्षक बक्षिसे ठेवली आहेत, अशी माहिती देवळाली प्रवरानगर परिषदेचे मुख्याधिकारी विकास नवाळे यांनी दिली आहे.

स्पर्धेच्या नियम व अटी नगरपरिषदेने परिषदेच्या फलकावर लावलेल्या आहेत. सोशल मिडीयाद्वारे स्पर्धेचा प्रचार व प्रसार नगर परिषद करीत आहे. शहरातील सर्वस्तरावरील नागरिकांनी मतदान करावे. हाच या स्पर्धेचा हेतू असल्याचे नगरपालिकेच्या मुख्याधिकारी विकास नवाळे यांनी सांगितले.देवळाली प्रवरा शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ दुर्गादेवी उत्सव मंडळे, व्यायाम शाळा, सामाजिक संस्था, विविध क्लब, रहिवाशी कॉलनी, बचत गट यामध्ये सहभागी होऊ शकतात. आपल्या परिसरातील जास्तीत जास्त मतदान घडून आणणे हे काम या मंडळांनी करायचे आहे. जास्तीत जास्त संख्येने स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन नगरपरिषदेचे प्रशासक किरण सावंत पाटील व मुख्याधिकारी विकास नवाळे यांनी केले आहे.

## नवीन भारताचे निर्माण करणे हेच भाजपाचे स्वप्न- खा. विखे



**समाचार/नगर-दि.६**

भाजप सरकारच्या गेल्या १० वर्षांच्या काळात कृषीपासून ते प्रत्येक क्षेत्रात भारताचा विकास झाला आहे. संरक्षणाच्या क्षेत्रात जिथे आपण सर्वच आयात करायचो, तिथे आज आपण अनेक देशांना शस्त्रे निर्यात करतो. यापुढील काळात सगळ्यांचा समतोल विकास करत असताना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासाचे संतुलन याच्या आधारावर नवीन भारताचे निर्माण करणे, हेच भाजपचे स्वप्न आहे. भारत आत्मनिर्भर होण्यासाठी, विश्वगुरु होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपचे प्रयत्न आहेत, असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

निवडणुकीच्या प्रचाराचा अंतिम टप्पा असून आतापर्यंतच्या प्रचारत लोकांनी प्रचंड प्रतिसाद दिला.अनेक छोट्या मोठ्या सामाजिक, राजकीय, सेवाभावी, धार्मिक त्याच बरोबर क्रिडा संघटनांनी समर्थन दिले. त्याच बरोबर महायुतीच्या सर्व घटक प्रक्षातील पदाधिकारी आणि कार्यक्रर्त्यांनी प्रचाराची धुरा सांभाळत नवी उर्जा दिली. यामुळे विजय केवळ आमचाच आहे. असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला. खा. विखे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विश्वाचे नेते आहेत. त्यांची लोकप्रियता ही जगाच्या कानाकोपऱ्यात आहे. यामुळे नगरकर सुद्धा त्यांच्या सभेची आतूरतेने वाट पाहत आहेत.

विरोधकांनी ज्या भूलथापा देऊन लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला हा डाव पंतप्रधान मोदींच्या सभेमुळे हाणून पाडला जाईल. आधीच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रेमात असलेली नगरची जनता व नगरचे वातावरण मोदीमय होऊन जाईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. मंगळवारी होणारी सभा ही नगरच्या विकासाची पायाभरणी करणारी सभा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीच नगरच्या जनतेकडे लक्ष ठेवले आहे. मागील पाच वर्षाच्या काळात त्यांच्या नेतृत्वाखाली नगर जिल्ह्याला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून अनेक विकासाची कामे मार्गी लावली आहेत.

## नगर दक्षिणमधील उमेदवारांच्या खर्चाची तपासणी

**समाचार/नगर-दि.६**

अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील सर्व उमेदवारांची निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे खर्च निरीक्षक शक्ती सिंग यांच्या उपस्थितीत दि.३ मे रोजी पार पडली. या तपासणीस २५ उमेदवारांपैकी २१ उमेदवार प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच उमाशंकर श्यामबाबू यादव, अमोल विलास पाचुंदकर, रावसाहेब शंकर काळे व दिलीप कोंडीबा खेडकर हे ४ उमेदवार अनुपस्थित असल्यामुळे त्यांना निवडणूक आयोग यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याद्वारे नोटीस देण्यात आलेली आहे. निरीक्षक शक्ती सिंग यांनी स्वतः तपासणी केली.

डॉ. कोल्हे; बेलवंडी येथे प्रचारसभा

## लोकशाही टिकविण्यासाठी आम्ही मैदानात उतरलो



**समाचार/नगर-दि.६**

एकीकडे पाच पिढयांचे राजकारण असताना एका सर्वसामान्य शिक्षकाचा मुलगा उभा रहतो. विचारावर विश्वास ठेऊन लोकशाही टिकविण्यासाठी थेट आमदारकीचा राजीनामा देण्यास तयार होतो हे महत्वाचे आहे. जेव्हा योध्दा शस्त्र टाकत नाही, शरण येत नाही तेंव्हा तो घेरला जातो. तेव्हा त्याला बदनाम केले जाते, अशा परिस्थितीत तुम्ही लढण्याची उमेद ठेवता ही महत्वाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन डॉ. अमोल कोल्हे यांनी बेलवंडी येथील सभेत केले.

डॉ. कोल्हे म्हणाले, खरे तर नगर दक्षिणमध्ये माझ्यावर टीका करण्याचे कारण नाही. तरीही टीका केली की अमोल कोल्हे घोडयावर दिसले, संसदेत घोडयावर दिसले, महानाटयात घोडयावर दिसले. घोडयावर बसल्यावर तुम्हाल एवढा त्रास होतो. तुम्ही थट्टा करता. आम्ही सोन्याचा चमचा घेऊन नाही जन्माला आलो. आम्हाला कष्ट करावे लागतात. तेंव्हा आमच्या घरातील चुल पेटते यात आमचा दोष काय ? आमच्या पाच, पाच पिढया राजकारणात नाहीत. मेडिकलला प्रवेश घ्यायचा होता. त्यावेळी रात्र- रात्र अभ्यास करावा लागला. ९७.३३ टक्के मार्क मिळवावे लागले. आम्हाला कोणी पेमेंटची सिट खैरातमध्ये वाटली नाही. पदव्युतर शिक्षणासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागली. जे केवळ मोठया घरात जन्म घेतल्याचे समाधान मिळते त्यावरून तुम्ही टीका करत असाल तर त्याचे आम्हाला वाईट वाटत नाही. कारण ८० टक्के जनता आमच्या सारखी स्वतःच्या मनगटाच्या जोरावर आणि हिमतीवर जगत असते असे डॉ. कोल्हे यांनी सुनावले.

यावेळी माजी आ. राहुल जगताप, राजेंद्र फाळके, घनश्याम शेलार, बाबासाहेब भोस, सुनंदा पाचपुते, सुनील गव्हाणे, राजेंद्र आघाव, संदेश कार्ले, बाळासाहेब हराळ, हरिदास शिर्के, प्रशांत दरेकर, अनिल कोकाटे, स्मितल वाबळे, मनोहर पोटे, संपत म्हस्के, अनिल वीर, रमेश खोमणे यांच्यासह मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.

## सारडा महाविद्यालयातील खेळाडूंचा गौरव



**समाचार/नगर-दि.६**

पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वार्षिक क्रीडा पारितोषिक समारंभात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावर विविध स्पर्धांमध्ये चमकलेल्या खेळाडूंचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक होते.

यावेळी प्रमुख अतिथी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व अंबरनाथ येथील कॉलेजच्या क्रीडा संचालिका शोभा पालवे व पुण्याच्या सेंट जोसेफ स्कूलच्या क्रीडा शिक्षिका राणी तागड यांच्या हस्ते खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, महाविद्यालयाचे अध्यक्ष सुमतीलाल कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, संचालिका प्रा. ज्योती कुलकर्णी, रणजित श्रीगोड, रवींद्र गुलाटी, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, महाविद्यालयाचे वरिष्ठ क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय धोपावकर व कनिष्ठ क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय साठे, उपप्राचार्य मंगला भोसले, क्रीडा मार्गदर्शक प्रा.साईनाथ थोरात, प्रा.अक्षय कर्डिले आदींसह महाविद्यालयातील विविध क्रीडाप्रकारात यशस्वी झालेले सुमारे ८०० खेळाडू विद्यार्थी, प्राध्यापक व पालक उपस्थित होते.

प्रा.शिरीष मोडक यांनी खेळाडूंचे कौतुक केले.

यावेळी सुमतिलाल कोठारी, अजित बोरा यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी केले. महाविद्यालयाचे वरिष्ठ क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय धोपावकर व कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. संजय साठे यांनी महाविद्यालयाचा क्रीडा विभागाचा वार्षिक अहवाल सादर केला.

### पान १ वरुन

## मोदींच्या सभेच्या पार्श्वभूमीवर वाहतूक मार्गात बदल

संत निरंकारी भवनच्या मैदानाकडे जाणाऱ्या रस्त्यावर, नुपुर इस्टेट एजन्सीपासून संत निरंकारी भवनच्या मैदानाकडे जाणाऱ्या रस्त्यावर, रेणुका माता मंदीरापासून जॉगींग ट्रॅककडे जाणाऱ्या रस्त्यावर, न्यू सिंध कॉर्नरपासून जॉगींग ट्रॅककडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांना प्रवेश करण्यात आला आहे. गंगा उद्यानकडून संत निरंकारी भवनकडे जणारी वाहतूक श्रीकृष्ण मंदिरापासून एलआयसी कॉलनीमार्गे प्रोफेसर कॉलनीकडे वळविण्यात आली आहे. एलआयसी कॉलनीकडून संत निरंकारी भवनकडे जाणारी वाहतूक श्रीकृष्ण मंदिरमार्गे गंगा उद्यानकडे वळविण्यात आली आहे. तारकपूर रस्त्यावरुन संत निरंकारी भवनाकडे जाणारी वाहतूक मिस्कीन मळामार्गे प्रोफेसर चौक रस्त्याकडे वळविण्यात आली आहे. गंगा उद्यानपासून पंकज कॉलनीकडे जाणारी वाहने इतर मार्गाने वळविण्यात यावेत.

## नोकरदाराची ७६ लाखाची फसवणूक

३० लाख रुपये दिले. मात्र, शिंदे याने ससाणे व तवले यांना मुद्दल अथवा परताव्याची रक्कम परत न देता दोघांची ७६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. भिंगार पोलिसांनी फसवणूक व एमपीआयडीनुसार गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक अतुल बोरसे व साळुंके करत आहेत.

## पवारांनी बारामतीच्या बाहेर काय केले- मंत्री विखे

शकलेले नाहीत. रयत शिक्षण संस्था ताब्यात घेवून त्याचा राजकीय अड्डा केल्याची टीका मंत्री विखे पाटील यांनी केली. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यावरही मंत्री विखे पाटील यांनी निशाणा साधला. थोरात वैफल्यग्रस्त झाले असून, त्यांच्या बोलण्याला आता कुठलाही आधार राहिलेला नाही. डॉ. सुजय विखे पाटील यांनी मागील पाच वर्षात केलेल्या कामांची चित्रफीत मी थोरात यांना पाठविणार असून, थोरातही अनेक वर्षे राज्याच्या मंत्रीमंडळात होते. नगरसाठी त्यांचे योगदान काय? मंत्री पदाच्या माध्यमातून तुम्ही जिल्ह्याला कसा फायदा करुन दिला, हे एकदा तरी सांगा. नाहीतर मी तरी महसूल मंत्रीपदाच्या माध्यमातून जिल्ह्यासाठी कोणते निर्णय केले हे सांगायला तयार आहे. पुर्वीप्रमाणे बदल्यांचे रेटकार्ड आमच्याकडे नाही. भाजपामध्ये येण्याची तुमची तयारी झाली होती. तुमच्यासाठी कोणता आमदार मध्यस्थी करीत होता, हे मला माहीत आहे. दिल्लीतून कसा नकार मिळाला. याचे शल्य आता थोरात यांना असल्याचा टोला मंत्री विखे पाटील यांनी लगावला. प्रकाश आंबेडकरांनी केलेल्या वक्तव्यावर प्रतिक्रीया व्यक्त करताना अशी उथळ विधाने त्यांनी टाळली पाहिजेत, असे ते म्हणाले. अमोल कोल्हे यांनी प्रचार सभेतून केलेल्या टिकेचाही त्यांनी समाचार घेतला. कोल्हेंना अजून खुप माहिती करुन घ्यायची आहे. यासाठी त्यांना नाटकातून बाहेर याचे लागेल असेही ते म्हणाले.

## सदानंद नक्का यांचे निधन

**समाचार/नगर-दि.६**



प्रेमदान हडको येथील रहिवासी सदानंद दत्तात्रय नक्का यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते. त्यांच्यावर नालेगांव अमरधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते धार्मिक व सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय असत.

## रसिकलाल संघराजका यांचे निधन

**समाचार/नगर-दि.६**



नगरमधील जुन्या पिढीतील ऑटोमोबाईल व्यावसायिक तथा हसमुख ऑटो मोबाईलचेसंचालक रसिकलाल संघराजका यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते.

त्यांच्या पार्थ्यावार आज संध्याकाळी ५ वाजता अमरधाम, नालेगाव येथे अंत्यसंस्कार होणार आहे.

## कॅमेऱ्यासह सात हजाराची रक्कम चोरीस

**समाचार/नगर-दि.६**

अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून बेडरूम मधील टेबलवर ठेवलेले फोटो व व्हिडिओ शुटींगसाठी वापरले जाणारे कॅमेरे, लेन्स व सात हजारांची रोख रक्कम चोरून नेली. ३ मे रोजी निर्मलनगर येथील एका अपार्टमेंटमध्ये ही घटना घडली. या प्रकरणी मधुकर भगवान खेडकर (वय ३३, रा. रुपाली हाईट्स, भगवानबाबा चौक, निर्मलनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ते ३ मे रोजी सकाळी व्हिडिओ शूटिंच्या कामासाठी बाबूर्डी घुमट येथे गेलेले असताना ही घटना घडली. सोनी कंपनीचा कॅमेरा, निकॉन कंपनीचा कॅमेरा, लेन्स व सात हजार रुपये रोख रक्कम असा ५० हजारांचा ऐवज चोरीला गेला आहे. अधिक तपास अंमलदार दीपक गांगर्डे हे करत आहेत.


**समाचार**

### वाचकांना नम्र सूचना

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## मुंबई शेअर भाव

**व्होडाफोन आयडिया कस्टमरमध्ये ६ लाखांची घट ब गटात मोठी मंदी**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक ६-५-२०२४ दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७३८९० |
| एसीसी | २४९३-९४ |
| एशियन पेंट | २९३०-३१ |
| बजाज ऑटो लि. | ९०२७-२८ |
| बलराम फूड चिनी | ३८८-८९ |
| भारत फोर्ज | १२४५-४६ |
| क्रॉम्प्टन | ३२८-२९ |
| डीएलएफ | ८७८-७९ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ६२७७-७८ |
| ग्रॅफाईट इंडिया | ६५८-५९ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २२४५-४६ |
| आयटीसी लि. | ४३४-३५ |
| एल ॲण्ड टी लि. | ३४५३-५४ |
| रिलायन्स इंड. | २८४४-४५ |
| एसबीआय | ८०७-०८ |
| टाटा मोटर्स | १००८-०९ |
| टाटा स्टील | १६८-६९ |
| टीसीएस | ३९३०-३१ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २४१-४२ |
| सुवेन फार्मा | ६७०-७१ |




जळगाव जिल्ह्यात महायुतीचे वर्षानुवर्षे वर्चस्व आहे. एकनाथ खडसे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आल्यानंतर या पक्षाच्या आशा वाढल्या होत्या; परंतु राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली. गौण खनिजासह अन्य प्रकरणात खडसे यांचा पाय खोल अडकत गेला. 'ईडी' चा फास आवळत चालला होता. त्यामुळे त्यांनी घरवापसी करण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच बंडाचे वारे वाहत असून त्यामुळे खडसे यांच्या सूनबाईंना हॅटट्रिक करणे सोपे झाले आहे.




# खडसेंच्या सूनबाईंना हॅटट्रिक सोपी

**राज्य वार्तापत्र**
**भागा वरखडे**

रावेर म्हटलं, की समोर येतात केळी आणि वांग्याची भाकरी व भाजी. संत मुक्ताबाई देवस्थान, भुसावळ रेल्वे स्थानक, दीपनगर औष्णिक वीज केंद्र, वरणगाव आयुध निर्माण फॅक्टरी याच मतदारसंघात येतात. बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांचे भादली हे जन्मगाव आणि कवयित्री बहिणाबाई चौधरींची असोदा हे माहेर याच मतदारसंघात आहे. मराठीसोबतच येथे लेवी बोली बोलली जाते. सत्ताधारी भाजपचा बालेकिल्ला असूनही रावेरमधील अनेक प्रश्न अजून सुटलेले नाहीत. २००९ मध्ये भाजपच्या हरिभाऊ जावळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या भय्यासाहेब पाटलांचा पराभव केला. २०१४ मध्ये भाजपने ज्येष्ठ नेते आणि त्यावेळचे विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे यांच्या सूनबाई रक्षा खडसे यांना मैदानात उतरवले. त्यांनी राष्ट्रवादीच्या मनीष जैन यांना हरवून लोकसभेत प्रवेश केला. २०१९ मध्ये त्या दुसऱ्यांदा खासदार झाल्या. त्यांनी काँग्रेसच्या डॉ. उल्हास पाटलांना पराभूत केलं. विधानसभेचा विचार केला, या मतदारसंघात भाजपचे दोन, काँग्रेसचे दोन, शिवसेनेचा एक आणि अपक्ष एक आमदार आहे. विजयाची हॅटट्रिक साधण्यासाठी भाजपने पुन्हा खडसे यांना तिसऱ्यांदा संधी दिली. रावेरमध्ये लेवा समाजाचा मोठा प्रभाव आहे. खडसे पुन्हा स्वगृही भाजपमध्ये परतणार असल्याने ताकद आणखी वाढली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने या वेळी उद्योजक श्रीराम पाटील यांना उमेदवारी दिली आहे. वंचित बहुजन आघाडीने संजय ब्राह्मणे यांना तिकीट दिल्याने चुरस आणखी वाढली. त्यातच पवार गटाचे माजी आमदार संतोष चौधरी नाराज आहेत. त्यांनी बंडाचा इशारा दिला आहे. आ. बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेच्या ते संपर्कात असल्याचे सांगितले जात होते. तसे झाले, तर तिरंगी लढतीचा फायदा रक्षा खडसे यांनाच मिळेल. पवार यांची इच्छा सूनबाईविरोधात एकनाथरावांनी किंवा त्यांची मुलगी रोहिणी हिने उतरावे अशी होती. परंतु सासरा–सून आणि नणंद–भावजयीतील लढत टाळताना खडसे यांनी स्वगृही परतण्याचा निर्णय घेतल्याने महायुतीसाठी ही निवडणूक अधिक सोपी झाली आहे. खडसे यांना स्वगृही परतल्यानंतरही गिरीश महाजन यांच्याशी संघर्ष करावा लागेल, असे चित्र आहे. ज्या पद्धतीने अजूनही महाजन हे खडसे यांचा अवमान करण्याची एकही संधी सोडत नाहीत आणि देवेंद्र फडणवीसही त्यांचे सावध स्वागत करतात, त्यावरून वरिष्ठ पातळीवरून जरी प्रवेश मॅनेज केला, तरी राज्यात खडसे यांची वाट बिकट आहे, हे तितकेच खरे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची वाढती लोकप्रियता, लेवा पाटील आणि मराठा समाजाचा पाठिंबा, एकनाथ खडसे यांची घरवापसी, गिरीश महाजनांचा पाठिंबा या बाबी रक्षा खडसेंच्या पथ्यावर पडणार आहेत. त्यांना महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीराम पाटील कशी टक्कर देतात, यावर निकालाचे गणित अवलंबून असणार आहे. खडसे भाजपमध्ये परतले, तरीही पडद्याआड खडसे विरुद्ध खडसे सामना आहे. रक्षा खडसेंच्या नणंदबाई रोहिणी खडसे राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष आहेत. भावजयीविरोधात त्या किती जोर लावतात, हे पाहणेही मनोरंजक ठरणार आहे. याच मतदारसंघामुळे महाजन आणि खडसे यांच्यात वैर निर्माण झाले. भाजपमध्ये असलेल्या या दोन्ही नेत्यांमध्ये ठिणगी पडली आणि हीच ठिणगी खडसे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील प्रवेशासाठी कारणीभूत ठरली होती. खडसे यांनी भाजप सोडण्याचा निर्णय घेतला आणि राष्ट्रवादीची वाट धरली, तेव्हा त्यांच्या स्नुषा रक्षा यांनी मात्र सासरेबुवांची साथ दिली नाही. त्यांनी भाजपसोबतच राहण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे सुनेविरुद्ध राष्ट्रवादीत असणाऱ्या खडसेंना महाविकास आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा देणे भाग होते; मात्र आता अचानक राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. कारण खडसे हे भाजपमध्ये घरवापसी करणार आहेत. रक्षा २०१० पासून राजकारणात सक्रिय आहेत. त्या कोथळी गावच्या सरपंच होत्या. नंतर त्या जिल्हा परिषद सदस्यपदी निवडून आल्या. २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार मनीष जैन यांचा सव्वा तीनलाख मतांनी पराभव केला. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्या रावेर मतदारसंघातून पुन्हा निवडून आल्या. त्यामुळे यंदा त्यांच्याकडे विजयाची हॅट्रिक करण्याची संधी आहे.

श्रीराम पाटील हे जळगाव जिल्ह्यातील उद्योजक आहेत. अत्यंत सामान्य परिस्थितीतून त्यांनी उद्योजक होण्यापर्यंत भरारी घेतली आहे. त्यांनी काही दिवसांपूर्वी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता; मात्र, त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांची भेट घेऊन रावेर लोकसभा मतदार संघातून लढण्याची इच्छा व्यक्त केली होती. 'साईराम प्लास्टिक अँड इरिगेशन' या नावाची त्यांची कंपनी आहे. 'सिका' या इलेक्ट्रिक टू व्हीलरच्या ब्रँडचे ते उत्पादक आहेत. त्याचबरोबर रावेरच्या 'श्रीराम फाउंडेशन'चे ते अध्यक्ष आहेत. त्यांना मराठा समाज भूषण, उद्योग भूषण असे पुरस्कार मिळाले आहेत. या मतदारसंघात जळगावमधील चोपडा, रावेर, भुसावळ, जामनेर आणि मुक्ताईनगर या पाच तर बुलडाण्यातील मलकापूर या विधानसभा मतदारसंघाचा समावेश करण्यात आला. मतदारसंघाची निर्मिती झाल्यापासून म्हणजे २००९ पासून येथे भाजपचाच खासदार राहिलेला आहे. २००९ मध्ये हरिभाऊ जावळे, तर २०१४ आणि २०१९ मध्ये रक्षा खडसे इथून खासदार बनल्या. २०१९ मध्ये ज्यांचा रक्षा खडसे यांनी दुसऱ्यांदा पराभव केला, तेच डॉ. उल्हास पाटील कुटुंबासह आता भाजपमध्ये सामील झाले आहेत. उल्हास पाटील यांनी पत्नी डॉ. वर्षा आणि कन्या केतकी यांच्यासह भाजपत प्रवेश केला. त्यामुळे मोठे आव्हान वाटणारे काँग्रेसचे डॉ. उल्हास पाटील यांना पक्षात आणण्यात भाजपला यश आल्याने इथे पुन्हा एकदा खडसे कुटुंबाचे वर्चस्व टिकून राहण्याची शक्यता आहे. केळी हे इथले प्रमुख पीक; मात्र इथं केळी प्रक्रिया उद्योग नाहीत. इथे केळीचा भाव, केळीच्या पीकविम्याचा मुद्दा आणि केळी प्रक्रिया उद्योगांकडे दुर्लक्ष हे महत्त्वाचे मुद्दे आहेत. मतदारसंघातील सर्वाधिक मतदार ग्रामीण भागातला असल्याने हा मुद्दा निवडणुकीत महत्त्वाचा ठरू शकतो. तरुणांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत. उद्योगधंदे, दळणवळणाची साधने, सिंचनाचे मोठे प्रकल्प रखडलेले आहेत. खडसे विरोधात असले, तरी त्यांचे राजकीय वैरी गिरीश महाजन यांनी मात्र मतदारसंघावर पकड मिळवली आहे. रक्षा यांना निवडून आणणे ही एकनाथरावांपेक्षा महाजनांचीच जास्त जबाबदारी आहे. हे दोघे थेटपणे लोकसभेच्या रिंगणात नसले, तरी ही लढतही खडसे विरुद्ध महाजन या अस्तित्वासाठीची असणार हे स्पष्टच आहे.

# किस्से निवडणुकीचे

## ● माजी मंत्र्यांची पैज

दुसऱ्या टप्प्यात झालेली बुलढाण्यातील निवडणूक सध्या चर्चेत आहे ती म्हणजे येथील क्षणाक्षणाला बदलणारं राजकारण आणि उमेदवारांकडून एकमेकांना मिळणाऱ्या धमक्यांमुळं. आता निवडणुकीच्या निकालाकडं राजकीय पक्षांचं, नेत्यांचं लक्ष लागलेलं असतं तितकंच लक्ष असतं कार्यकर्त्यांचं. त्यामुळं 'तुमच्यासाठी कायपण' असं म्हणणारे कार्यकर्ते काय करतील याचा नेम नाही. नुकत्याच झालेल्या निवडणुकीच्या निमित्तानं असाच किस्सा घडला. किस्सा आहे बुलडाणा जिल्ह्यातील एका माजी मंत्र्यांच्या विश्वासाचा. लोकसभा निवडणुकीत बुलडाणा जिल्ह्यातील निकालात महायुतीचे उमेदवार खासदार प्रतापराव जाधव यांचा पराभव होणार यावर पैज लावण्यात आली आहे. यासाठी ३.१५ लाख रुपयांची पैज असून पैज जिंकल्यावर ती लावणाऱ्यास तब्बल ९.४५ लाख रुपये मिळणार आहे. राज्याचे माजी महसूलमंत्री सुबोध सावजी यांनी ही पैज लावली आहे. सावजी हे नेहमीच आपल्या अफलातून आंदोलन, थेट मारधाडीच्या धमक्या आणि जनतेच्या हितासाठी वाट्टेल ते करण्यासाठी चर्चेत असतात. यापूर्वी भाजपचे आमदार राम कदम यांच्या 'महिलांचे अपहरण' या वक्तव्यावरून कदम यांची जीभ तोडणाऱ्याला पाच लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. संभाजी भिडे यांना जीवे मारण्याची धमकी ही दिली होती. भिडे गुरुजींना अटक करा. अन्यथा मी त्यांचा मर्डर करेल, अशी ती धमकी होती. निर्ढावलेली यंत्रणा जागी होत नाही, हे पाहून सावजी यांनी थेट जिल्हा परिषदेतील पाणी पुरवठा विभागातील अधिकाऱ्याचा खून करण्याची धमकी दिली होती. आता पुन्हा एकदा ते चर्चेत आले आहेत आणि ते म्हणजे बुलडाणा लोकसभा मतदारसंघात झालेल्या निवडणुकीत विद्यमान खासदार प्रतापराव जाधव यांचा पराभव निश्चित असल्याचा दावा त्यांनी केल्यानं. त्यांनी मुंबईच्या एका मित्रासोबत लाखोंची पैज लावली आहे. यांचा पराभव झाल्यास माजी सावजी यांनी लावलेल्या पैजेप्रमाणं नऊ लाख ४५ हजार रुपये रोख मिळणार आहेत. बुलडाण्याच्या निवडणुकीत महायुतीचे प्रतापराव जाधव बाजी मारणार, की महाविकास आघाडीचे नरेंद्र खेडेकर विजयी गुलाल उधळणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## ● विरोधकाला निवडून देण्याचं अटलजींचं आवाहन!

अटलबिहारी वाजपेयी यांनी १९५७ मध्ये पहिली लोकसभा निवडणूक तीन जागांवरून लढवली होती. भारतीय जनसंघानं त्यांना उमेदवारी दिली होती. अटलजींनी उत्तर प्रदेशातील बलरामपूर, लखनऊ आणि मथुरा लोकसभा मतदारसंघातून पहिली निवडणूक लढवली होती. १९५७ च्या लोकसभा निवडणुकीत राजा महेंद्र प्रताप अपक्ष उमेदवार म्हणून अटलजींच्या विरोधात निवडणूक लढवत होते. महेंद्र प्रताप हे क्रांतिकारक होते. त्यांचं स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाचं योगदान होतं. राजा महेंद्रला विजयी करण्याचं आवाहन गांधी पार्क, मथुरा येथे सुरू असलेल्या त्यांच्या एका जाहीर सभेत अटलजी म्हणालं होतं, की मथुरेतील जनता मला जे प्रेम देत आहे, तेच प्रेम मला बलरामपूरमध्येही मिळत आहे. त्यामुळं तुम्ही राजा महेंद्र प्रताप यांना मथुरेतून विजयी करा आणि माझी काळजी करू नका अशी माझी इच्छा आहे. देवाची इच्छा असेल तर मी बलरामपूरमधून जिंकेन, असं ते म्हणाले. अगदी तसंच घडलं. अटलजींनी बलरामपूरमधून निवडणूक जिंकली आणि मथुरेत त्यांची अनामत रक्कम जप्त झाली. क्रांतिकारकाच्या विजय मिळवण्यासाठी अटलजींनी स्वतः पराभव स्वीकारला होता.

## ● राग व्यक्त करण्यासाठी ५३७ जण निवडणुकीच्या मैदानात

मुद्दा आहे १९९६ च्या लोकसभा निवडणुकीचा. पीव्ही नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखालील दहाव्या लोकसभेचा कार्यकाळ संपला होता. एप्रिल आणि मे महिन्यात ११व्या लोकसभेसाठी सार्वत्रिक निवडणुका होत होत्या. प्रत्येक निवडणुकीप्रमाणं या निवडणुकीतही राजकीय पक्षांचे आपापले मुद्दे होते; पण शेतकरी, मजूर, महिला, तरुण यांच्या व्यतिरिक्त स्थानिक पातळीवरही काही गंभीर संयुक्त समस्या होत्या. त्या ऐकल्या जात नाहीत. अशा स्थितीत हा मुद्दा राष्ट्रीय व्यासपीठावर आणण्यासाठी संतप्त लोकांनी खास रणनीती आखली आणि पाचशेहून अधिक लोकांनी एकाच लोकसभा जागेवरून निवडणूक लढवली. ६६ महिलांसह ५३७ जणांनी अर्ज भरले. नालागोंडा लोकसभा मतदारसंघ अविभाजित आंध्र प्रदेश अंतर्गत होता. २०१४ मध्ये, तेलंगणा एक नवीन राज्य म्हणून अस्तित्वात आले आणि नलगोंडा प्रदेश तेलंगणाचा भाग झाला. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत, नलगोंडा लोकसभा मतदारसंघातील लोक आपल्या नेत्यांच्या हलगर्जीपणामुळे इतके संतप्त झाले होते, की त्यांनी काहीतरी मोठं करण्याचा निर्णय घेतला. हिंसेऐवजी त्यांनी 'गांधीवादी' पद्धतीचा अवलंब करून निवडणूक लढवून आपला निषेध व्यक्त केला. राव हे मोठे व्यक्तिमत्व, साधेपणानं ते पंतप्रधानपदापर्यंत पोहोचलेले लहान उंचीचे नेते. ज्या जागेवर ५३७ जणांनी अर्ज दाखल केले. त्यापैकी ३५ जणांचे उमेदवारी अर्ज बाद झाले. एकूण ४८० उमेदवार रिंगणात राहिले. यामध्ये ६० महिला उमेदवारांचाही समावेश होता. निवडणुकीचा निकाल आला तेव्हा ४८० पैकी ४७७ उमेदवारांची अनामत जप्त झाली. लोकसभेच्या कोणत्याही जागेसाठी सर्वाधिक उमेदवार असण्याचा हा विक्रम फक्त नालागोंडा यांच्या नावावर आहे. बेळगावात ४५४ चा जामीन जप्त केवळ नालागोंडाच नाही, तर कर्नाटकातील बेळगाव लोकसभा मतदारसंघही मोठ्या प्रमाणात उमेदवारी दिल्यानं देशभर चर्चेत आला. बेळगाव लोकसभा मतदारसंघातही पाचशेहून अधिक म्हणजे ५२१ जणांनी (५८ महिला आणि ४६३ पुरुष) उमेदवारी अर्ज दाखल केले. दोन महिलांसह १२ जणांचे दावे फेटाळण्यात आले. ५३ जणांनी नावे मागे घेतली. एकूण ४५६ जणांमध्ये स्पर्धा होती. मतमोजणी झाली, तेव्हा केवळ दोन जणांची सुरक्षा ठेव शिल्लक होती.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लाट असो, की काँग्रेसची किंवा अन्य कुणाची; धुबरी लोकसभा मतदारसंघावर कायम बदरुद्दीन अजमल यांचेच कायम वर्चस्व राहिले आहे. अजमल हे धुबरी मतदारसंघातून सलग तीन वेळा खासदार आहेत. या वेळीही ते निवडणूक लढवत आहेत. त्यांची हॅटट्रिक रोखू शकतील, अशी स्थिती नाही.**

# बदरुद्दीन अजमल यांचाच प्रभाव

**राज्यरंग**

आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी, फेब्रुवारी २०२१ मध्ये 'जे राजकारण करत आहेत, ते आसामसाठी धोकादायक आहे. समाजसेवेच्या नावाखाली ते कट्टरवादी संघटनांकडून पैसे घेत आहेत. असे नेटवर्क तयार केले जात आहे, जे आसामच्या संस्कृतीसाठी योग्य नाही. ते ज्या लोकांना सोबत घेऊन जात आहेत, त्यामुळे ते आसामचा शत्रू आहेत,' असे म्हटले होते. सरमा तेव्हा भाजप सरकारमध्ये मंत्री होते. पुढच्याच महिन्यात राज्यात निवडणुका झाल्या. हिमंता यांनी आसामचा शत्रू म्हणून वर्णन केलेल्या बदरुद्दीन अजमल यांच्या पक्ष 'एआययूडीएफ'ने १६ जागा जिंकल्या. काँग्रेस आणि भाजपनंतर या जागा तिसऱ्या क्रमांकाच्या होत्या. अजमल यांनी विधानसभेच्या निवडणुकीत दोनदा विजय मिळवला आहे. आताही आसाम लोकसभेच्या १४ पैकी १३ जागा जिंकण्याचा भाजपचा दावा आहे. एक जागा उरली आहे फक्त धुबरी. कारण तिथून बदरुद्दीन अजमल निवडणुकीच्या रिंगणात आहेत. धुबरीत अजमल यांचा पराभव सोडा, त्यांच्या जवळपासही कोणी जाऊ शकले नाही. काँग्रेसचे वर्चस्व असो की मोदी लाट; अजमल २००९ पासून अजिंक्य आहेत. २०१९ च्या निवडणुकीत त्यांनी २.२६ लाख मतांनी विजय मिळवला होता. आसाममध्ये दहा जागांवर मतदान झाले असून चार जागा शिल्लक आहेत. तिसऱ्या टप्प्यात येथे सात मे रोजी मतदान होणार आहे. यामध्ये धुबरीचा समावेश आहे. येथे अजमल काँग्रेसचे रकीबुल हुसेन आणि आसाम गण परिषदेचे जबेद इस्लाम यांच्या विरोधात लढत आहेत. भाजपने एकही उमेदवार उभा केलेला नाही. ते मित्रपक्ष आसाम गण परिषदेला पाठिंबा देत आहेत. हिमंत सरमा अजमलला आसामचा शत्रू म्हणू शकतात. गृहमंत्री अमित शाहा यांनी घुसखोरीला प्रोत्साहन दिल्याचा आरोप केला असेल; परंतु धुबरीमध्ये अजमल यांना पराभूत करणे सध्या अशक्य आहे. धुबरी मतदारसंघात १९७१ ते २००४ पर्यंत सातत्याने काँग्रेस विजयी होत राहिली. त्यानंतरही पक्षाचा उमेदवार नेहमीच दुसऱ्या क्रमांकावर राहिला. या वेळी काँग्रेस तिसऱ्या क्रमांकावर जाऊ शकते. भाजपने बदरुद्दीन अजमलसोबत करार केल्याचा आरोप काँग्रेस करत आहे. आम्हाला धुबरी जिंकायची नाही, असेही सरमा यांनी म्हटले आहे. ते तिथे प्रचाराला जाणार नाहीत. धुबरी येथे ८५ टक्के मतदार मुस्लिम आहेत. या वेळीही तिन्ही उमेदवार मुस्लिम आहेत. ही स्पर्धा फक्त 'एआययूडीएफ' आणि आसाम गण परिषद यांच्यातच दिसत आहे. काँग्रेसचे रकीबुल बाहेरचे असल्याने मागे पडले आहेत.

अजमल यांच्या खासदारकीच्या काळात धुबरी येथे वैद्यकीय महाविद्यालय बांधले गेले. ब्रह्मपुत्रा नदीवर सर्वात लांब पूल बांधला जात आहे. याचे श्रेय सामान्य लोक अजमल यांना देतात. धुबरीत सर्वाधिक बंगाली भाषिक मुस्लिम आहेत, हे अजमल यांचे मतदार आहेत. धुबरीत बंगाली भाषिक मुस्लिमांची संख्या जास्त आहे. हे बदरुद्दीन अजमलचे मूळ मतदार आहेत. ब्रह्मपुत्रा नदीच्या काठावर वसलेले हे शहर ब्रिटिश राजवटीतून आलेल्या मजुरांनी वसवले होते. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने १४ पैकी सात जागा जिंकल्या होत्या. भाजपला चार, आसाम गण परिषद आणि बोडोलँड पीपल्स फ्रंटला प्रत्येकी एक जागा मिळाली. या निवडणुकीत अजमल यांनी धुबरीची जागा काँग्रेसकडून हिसकावून घेतली होती. मुस्लिम लोकसंख्येमुळे धुबरीमध्ये प्रत्येक पक्ष मुस्लिम उमेदवार उभा करतो. काँग्रेसचे उमेदवार रकीबुल हुसैन हे आपल्या सभांमध्ये सांगत आहेत, की हिमंता यांना हटवायचे असेल




तर अजमल यांना पराभूत करावे लागेल. अजमल आणि हिमंता यांच्यात मैत्री आहे. काँग्रेसचे उमेदवार रकीबुल हुसेन हेही संविधान वाचवण्याचा मुद्दा मांडत मते मागत आहेत. अजमल यांना दिलेले मत भाजपला जाईल, असे रकीबुल लोकांना सांगत आहेत. हा संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यात काही प्रमाणात ते यशस्वीही होत आहेत; मात्र या गोष्टी सोडून अनेकजण विकासावर मतदान करण्याबाबत बोलत आहेत. गेल्या निवडणुकीत अजमल यांनी आश्वासन दिले होते, की ते जिंकले तर फुलबारी पूल बांधू. त्यांनी दिलेले वचन पूर्ण केले. पुलाचे काम वेगाने सुरू आहे. भाजपने धुबरीमध्ये उमेदवार दिलेला नाही. त्यांचे मित्र आसाम गण परिषदेचे जाबेद इस्लाम निवडणूक लढवत आहेत. जाबेद इस्लाम म्हणतात, की सरकारने खूप काम केले आहे. योजनांसोबतच लोकांना विकासही मिळाला आहे. दुसरीकडे काँग्रेसचे उमेदवार रकीबुल हुसैन हे समान नागरी कायद्याला विरोध करत आहेत. रकीबुल हे समगुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. २०२१ पासून ते आसाम विधानसभेत विरोधी पक्षाचे उपनेते आहेत. १५ वर्षे ते काँग्रेसच्या सरकारमध्ये मंत्री होते. ते म्हणतात, की धुबरीचे लोक हिमंता बिस्वा सरमाच्या विरोधात आहेत; पण बदरुद्दीन अजमल हिमंताच्या पाठीशी उभे आहेत. मुख्यमंत्र्यांच्या घरांवर बुलडोझर चालवत आहेत. पोलिस लोकांना उचलून नेत आहेत; पण अजमल मुख्यमंत्र्यांच्या विरोधात काहीही करत नाही.

अजमल समान नागरी संहितेला निवडणुकीत मुद्दा बनवत आहेत. सरकारने समान नागरी कायदा आणू नये, असे त्यांचे म्हणणे आहे. काश्मीरमध्ये ३७० कलम काढून आणि तिहेरी तलाक रद्द करून काय केले? त्यांच्या शिक्षणासाठी हे सरकार काही का करत नाही? त्यांच्यावर होणारे अत्याचार सरकार का थांबवत नाही? या सरकारने हिजाबच्या बहाण्याने बेंगळुरूमधील मुलांची वर्षे खराब केली आहेत. हे सरकार खऱ्या प्रश्नांपासून लोकांचे लक्ष विचलित करते, असा त्यांचा आरोप आहे. धुबरी हा मागासलेला जिल्हा आहे, मग तो रोजगार असो वा शिक्षण; या वेळची निवडणूक ही परिवर्तनाची निवडणूक असेल. अजमल यांच्या कार्यकाळाला १५ वर्षे झाली. अजमल यांनी या १५ वर्षांत काय केले, असे प्रश्न लोक विचारत आहेत. धुबरीतील लोकांना शहरात काम मिळत नाही. त्यांना बाहेर जावे लागेल. परिसीमनानंतर धुबरीमध्ये २७ लाख मतदार आहेत. येथे मुस्लिम मतदारांची संख्या जास्त आहे. ते धर्माच्या नावावर मतदान करतात. यामुळेच अजमल निवडणूक जिंकतात. अजमल यांना इथे कारखानाही काढता आला नाही. रोजगाराचा प्रश्न सर्वात मोठा आहे. धुबरी जागेवर एकही हिंदू उमेदवार विजयी झालेला नाही. मुस्लिम उमेदवाराव्यतिरिक्त कोणीही निवडणूक लढवली तर तो निवडणूक जिंकू शकत नाही, असे जाणकारांचे मत आहे. धुबरी ही पन्नास टक्के किंवा त्याहून अधिक मुस्लिम लोकसंख्या असलेल्या १५ लोकसभा जागांपैकी एक आहे. १९९८ मध्ये भाजपचे डॉ. पन्नालाल ओसवाल यांनी येथून निवडणूक लढवली होती. त्यांना २४ टक्के मते मिळाली. १९९९ मध्ये 'युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम' या दहशतवादी संघटनेने त्यांची हत्या केली होती. या पार्श्वभूमीवर आता अजमल यांचा विजयरथ रोखणे कुणालाही शक्य होणार नाही.

# टक्के टोणपे

✻ 'पंतप्रधान नेमकं कोणाबद्दल बोलले, ते माहिती असायला मी काही ज्योतिषी नाही. त्यांच्या मनात नक्की कोण ते त्याबाबतीत मी पुढच्या सभेत मोदींना विचारेन आमची पुढची प्रचारसभा जिथं असेल आणि तिथं मीदेखील असेन. मी तेव्हा मोदींना त्या वक्तव्याबाबत विचारेन. भटकत्या आत्म्याचं नाव काय तेदेखील विचारेन. त्यांनी नेमका कोणत्या उद्देश डोळ्यासमोर ठेवून हे वक्तव्य केलं, त्याबाबतही विचारेन. त्यांनी मला नाव सांगितलं, की मी ते तुम्हाला सांगेन.

**– अजित पवार**

**– बाळासाहेबांचं भाषण व्यासपीठावर असूनही न ऐकल्याचं सांगणारे मनोहर जोशी आणि अजितदादा यांच्यात काहीच फरक दिसत नाही. अडचणीच्या काळात ऐकलं नसल्याचा हा बहाणा चांगला रामबाण उपाय आहे.**

✻ 'देवेंद्र फडणवीस यांना काहीही बोलण्याचा अधिकार नाही. ते ब्राह्मण आहेत, म्हणून त्यांचा शाप आता लागत नाही. ते ओरिजनल ब्राह्मणही नाहीत. ते मटण खाणारे ब्राह्मण आहेत. त्यांनी २०१४ मध्ये सत्तेत येण्यासाठी धनगर व मराठा समाजासह विविध जातींना न्याय देण्याचे आश्वासन दिले होते; पण त्यांनी यापैकी एकही काम पूर्ण केले नाही

**– नाना पटोले**

**– धर्मनिरपेक्ष पक्ष आणि घटनेवर विश्वास असल्याचे सांगणारे जातीयवाद आणि अंधश्रद्धेचा आधार घ्यायला लागले आहेत.**

✻ 'महाविकास आघाडीच्या उमेदवाराला संगमनेरमधून लीड देण्याची जबाबदारी आमच्या कार्यकर्त्यांची आहे; पण कुणीही आम्ही तीन लाखांच्या मताधिक्याने निवडून येऊ असे म्हणू नका. कारण आपल्याला लढावे लागणार आहे. तीन लाखांची लीड म्हटले, की आमचा गडी थंड होतो. जास्त पळत नाही. त्यामुळे वाकचौरे गैरसमजात राहू नका. आमच्यावर कृपा करा. तुम्ही निश्चितच निवडून येणार; पण मतदारांना आणखीन समजावून सांगावे लागेल.

**–आ. बाळासाहेब थोरात**

**–फाजील आत्मविश्वास असू नये. तुम्हीच कानउघाडणी केली, हे बरं झालं.**

✻ मोहिते–पाटील घराण्यानं आजपर्यंत अनेक लोकांच्या जमिनी बळकावल्या, लोकांवर हल्ले केले. खून केले; मात्र यापुढं हे सहन केलं जाणार नाही. मी या माढा तालुक्याला मोहिते–पाटील यांच्या दहशतीतून मुक्त करणार आहे.

**–देवेंद्र फडणवीस**

**–आता आतापर्यंत तुमच्यासोबत होते, तेव्हा ते चालत होतं. पाच वर्षे त्यांचा दहशतवाद तुम्हाला चालला असं दिसतं.**




## विखे-थोरात गटाची प्रतिष्ठा पणाला

# शिर्डीत तिरंगी लढतीत कुणाची सरशी?

**सहकारी साखर कारखानदारीचा मोठा प्रभाव असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी लोकसभा मतदारसंघात आताच्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार, विद्यमान खा. सदाशिव लोखंडे, विरोधी महविकास आघाडीचे उमेदवार माजी खा. भाऊसाहेब वाकचौरे आणि वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार उत्कर्षा रूपवते अशी तिरंगी लढत होत आहे. ना. राधाकृष्ण विखे आणि आ. बाळासाहेब थोरात या जिल्ह्यातील दिग्गज आजी - माजी महसूलमंत्र्यांसाठी प्रतिष्ठेच्या झालेल्या या निवडणुकीत राज्य महिला आयोगाच्या सदस्या उत्कर्षा रूपवते यांनी काँग्रेसची उमेदवारी न मिळाल्याने पक्षाचा तडकाफडकी राजीनामा देत वंचित बहुजन आघाडीकडून रिंगणात उडी घेतली. त्यामुळे शिर्डीची निवडणूक रंगतदार झाली आहे.**

साखर आणि शिक्षण सम्राटांचे प्राबल्य असलेला शिर्डी लोकसभा मतदारसंघ राखीव झाल्यापासून येथील राजकारणाचा बाज बदलला आहे, त्याआधी माजी केंद्रीयमंत्री स्व. बाळासाहेब विखे यांनी जुन्या कोपरगाव लोकसभा मतदारसंघाचे संसदेत अनेक वर्षे प्रतिनिधित्व केले. माजी खा. स्व. शंकरराव काळे, माजी खा. स्व. भीमराव बडदे हेही कोपरगाव मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले. मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यानंतर कोपरगाव लोकसभा मतदारसंघ शिर्डी या नावाने राखीव झाला. त्यानंतर २००९ च्या निवडणुकीत या शिर्डी मतदारसंघातून शिवसेनेचे भाऊसाहेब वाकचौरे निवडून गेले. २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीतही शिवसेनेने हा मतदारसंघ आपल्याकडेच राखण्यात यश मिळविले. खा. सदाशिव लोखंडे सलग दोनवेळा शिवसेनेच्या तिकिटावर लोकसभेवर निवडून गेले. आताच्या निवडणुकीतही खा. लोखंडे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून महायुतीचे उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. ही निवडणूक जिंकून खासदारकी ची हॅटट्रिक करण्याचा त्यांचा निर्धार आहे. २०१४ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविणाऱ्या वाकचौरे यांचा खा. लोखंडे यांच्याकडून पराभव झाला. २०१९ ची निवडणूक वाकचौरे यांनी अपक्ष लढविली. तेथेही त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. मध्यंतरी शिवसेनेत फूट पडली. खा. लोखंडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे खा. वाकचौरे यांनी शिवसेनेच्या ठाकरे गटात प्रवेश करीत शिर्डी लोकसभेची उमेदवारी पक्की केली. मतदारसंघात प्रचारही सुरू केला. मुख्यमंत्री शिंदे यांनी शिर्डीतून खा. लोखंडे यांची उमेदवारी जाहीर करणे अपेक्षितच होते. जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि महायुतीच्या उत्तरेतील लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून खा. लोखंडे यांची उमेदवारी जाहीर झाली. खा. लोखंडे यांचा मतदारसंघात संपर्क कमी असल्याचीही चर्चा झाली. रिपाइंचे अध्यक्ष आणि केंद्रीयमंत्री ना. रामदास आठवले यांनीही शिर्डी मतदारसंघात महायुतीची उमेदवारी आपल्यालाच मिळावी, अशी आग्रही मागणी केली होती. मात्र भाजपा श्रेष्ठी आणि मुख्यमंत्र्यांनी त्यांची नाराजी दूर केल्याचे सांगितले गेले. काँग्रेसकडून पक्षाच्या राज्य पदाधिकारी आणि महिला आयोगाच्या सदस्या उत्कर्षा रूपवते यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारीची मागणी पक्षश्रेष्ठींकडे केली होती. राज्याचे माजी मंत्री स्व. दादासाहेब रूपवते आणि रूपवते कुटुंबीयांचे काँग्रेससाठी मोठे योगदान आहे. त्यामुळेच ही उमेदवारी मिळावी, असे उत्कर्षा रूपवते यांचे म्हणणे होते. मात्र महाविकास आघाडीत शिर्डीची जागा शिवसेनेकडे गेली. वाकचौरे यांची उमेदवारीही जाहीर झाली. त्यामुळे नाराज झालेल्या रूपवते यांनी थेट माजी खा. प्रकाश आंबेडकर यांची भेट घेत शिर्डोतून वंचित बहुजन आघाडीची उमेदवारी मिळविली. प्रचारही सुरू केला. उत्कर्षा रूपवते यांनी मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे पाटील यांची छ.संभाजीनगर (औरंगाबाद) येथील रुग्णालयात जाऊन थेट भेट घेत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारीही उपस्थित होते. रूपवते यांच्या या भेटीचीही चर्चा मतदारसंघात होते आहे. या पार्श्वभूमीवर रूपवते यांच्या वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारीने शिर्डीची लढत तिरंगी झाली आहे.





**नंदकुमार सातपुते**

महायुतीचे उमेदवार खा. लोखंडे यांच्या विजयाची जबाबदारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे महसूल आणि जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यावर सोपविली आहे. कोपरगांवचे राष्ट्रवादी आमदार आशुतोष काळे, अकोल्याचे आमदार किरण लहामटे, माजीमंत्री मधुकरराव पिचड, माजी आ. वैभव पिचड हेही खा. लोखंडे यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत. श्रीरामपूरमध्ये राष्ट्रवादीचा आदिक गट महायुतीच्या प्रचारात सहभागी झाला आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी माजी आ. भानुदास मुरकुटे यांच्याशी चर्चा करीत त्यांचीही साथ मिळविण्याचा प्रयत्न केला. शिर्डी विधानसभा मतदारसंघ ना. विखे यांचाच असल्याने तेथे महायुतीला फारशी काळजी वाटत नाही. ना. विखे हेही शिर्डी लोकसभा मतदारसंघात संपर्क ठेवून आहेत. महायुतीचे लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा करतानाच महायुतीच्या बैठकाही घेत आहेत. अर्थात ना. विखे यांचे पहिल्या फळीतील कार्यकर्ते, यंत्रणा नगर दक्षिणेत भाजपा उमेदवार खा. सुजय विखे यांच्या प्रचारात व्यस्त आहे. ना. विखे यांचेही दक्षिणेत विशेष लक्ष आहे. त्यांचे दुसऱ्या फळीतील पदाधिकारी, कार्यकर्ते मात्र खा. लोखंडे यांच्या प्रचारात सक्रिय असल्याचे सांगितले जाते. खा. लोखंडे यांच्यासाठी गणेश साखर कारखान्याच्या पट्ट्यात ना. विखे यांच्याबरोबरच भाजपाच्या कोल्हे गटाची भूमिका महत्वाची ठरणार आहे. नेवासा विधानसभा मतदारसंघात खा. लोखंडे यांची भिस्त भाजपाचे माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे आणि महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांवरच आहे. या निवडणुकीत खा. लोखंडे यांच्यासाठी शिर्डी, कोपरगाव आणि अकोले मतदारसंघ निर्णायक ठरण्याची शक्यता वर्तविली जाते. कोपरगावमध्ये कोल्हे गटाच्या भूमिकेकडे सर्वांचेच लक्ष असेल. कोपरगाव मतदारसंघात प्रभावी असलेल्या काळे - कोल्हे गटांबरोबरच परजणे या महायुतीच्या घटकांचे ताकदीचे प्रयत्न खा. लोखंडे यांच्यासाठी महत्वाचे आहे.

महाविकास आघाडीचे उमेदवार माजी खा. वाकचौरे यांच्यासाठी राज्याचे माजी महसूलमंत्री आ. बाळासाहेब थोरात यांचीच भूमिका महत्वाची ठरणार आहे. आ. थोरात यांनी वाकचौरे यांच्यासाठी महाविकास शिर्डी लोकसभा मतदारसंघातील आघाडीचे सर्व नेते आणि पदाधिकाऱ्यांना बरोबर घेत प्रचारयंत्रणा राबविली आहे. माजी. खा. वाकचौरे १० वर्षांपूर्वी खासदार असताना त्यांनी मतदारसंघात चांगला संपर्क ठेवला होता. त्यांनीही मतदारसंघातील गावोगावी जात मतदारांशी संवाद साधत प्रचार चालविला आहे. वाकचौरे यांच्यासाठी संगमनेर , नेवासा आणि श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघ अधिक महत्वाचे आहेत. या तिन्ही विधानसभा मतदारसंघात सध्या महाविकास आघाडीचे आमदार आहेत. त्यामुळे आ. थोरात यांच्याबरोबरच आ. शंकरराव गडाख आणि आ. लहू कानडे यांनीही वाकचौरे यांच्या प्रचारात अधिक लक्ष घातले आहे. अर्थात या निवडणुकीला थोरात - विखे यांच्यातील राजकीय संघर्षाचीही किनार आहे. महत्वाचे म्हणजे भाजपा पक्षांतर्गत ना. विखे आणि कोल्हे गटातील राजकीय संघर्षात या निवडणुकीत कोल्हे गट खा. लोखंडे यांना साथ देणार की, विरोधी महाविकास आघाडीला मदत करणार, याकडे सर्वांचेच लक्ष आहे. मध्यंतरी झालेल्या गणेश कारखाना निवडणुकीच्या निमित्ताने भाजपाच्या कोल्हे गटाची काँग्रसचे नेते आ. थोरात यांच्याशी झालेली जवळीक मतदारसंघात चर्चेचा विषय आहे. त्याचे काही पडसाद या निवडणुकीत उमटणार का? याचीही चर्चा होते आहे. एकूणच ना. विखे आणि आ. थोरात यांची प्रतिष्ठा पणाला लागलेल्या शिर्डी लोकसभा मतदारसंघातील तिरंगी लढतीत कुणाची सरशी होणार, याकडेच सर्वांचे लक्ष आहे.

# भारतीय राजपटावरील दोन संघर्षमय कालखंडाचा इतिहास



**भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पं. जवाहरलाल नेहरूंचा कालखंड एक चीनचा आक्रमण सोडलं तर शांततामय होता. शास्त्रीजींच्या कालखंडात पाकिस्तानशी झालेली लढाई, भारताने मिळविलेला विजय संपूर्ण भारतीयांना एकत्रित आणणारा ठरला. भारतीय राजपटलावरती दोन क्रांतीकारक घटना घडल्या. दोन परस्पर विरोधी विचारांचे व्यक्तिमत्व संघर्षमय जीवनातून राजकारणात उच्चपदापर्यंत स्थिरावले. १९६९ ते १९८४ हा एक कालखंड २०१४ ते २०२४ आणि पुढे हा दुसरा कालखंड आहे. दोन परस्पर विरोधी विचार एक इंदिरा गांधींचा आणि आज मोदींचा. तरीही या दोन्हीही कालखंडात या दोन्हीही नेतृत्वामध्ये कामाची पध्दती, कामाचे नियोजन, जनतेशी असलेला संपर्क या समान क्रिया असल्याचे मला जाणवते.**



१९६९-७० साली इंदिरा गांधी चमकू लागल्या आणि जसजशा त्या पुढे येऊ लागल्या तसतसा काँग्रेस अंतर्गत विरोध त्यांना वाढू लागला. नव्याने विकसित झालेले अनेक राजकीय पक्ष हळूहळू पुढे सरसावू लागले आणि ७०-७१ मध्ये एक वेगळ्या संघर्षाची सुरूवात झाली. तो संघर्ष दोन आघाड्यांवरती होता. एक पक्षांतर्गत आघाडी आणि दोन पक्षाबाहेरील विरोधकांची आघाडी. पण या प्राथमिक संघर्षाला तोंड देत देत इंदिराजींनी आपले नेतृत्व ठामपणे प्रस्थापित केले. याला प्रमुख कारण त्यांचा जनतेशी असलेला सरळ संवाद. पुढे काळ आणखी बदलला. जयप्रकाश नारायणसारखा एक निःस्वार्थ नेता पुढे आला. इंदिरा गांधींना हरविण्यासाठी सर्वांना एकत्रित केले गेले. यातून जनता पक्ष उभा राहिला आणि निवडणुकीत इंदिरा गांधींचा पराभव झाला. त्याच रात्री अनेक काँग्रेसवाले इंदिरा गांधींना सोडून गेले आणि इंदिरा गांधींच्या राजकारणात खऱ्या अर्थाने मोठा संघर्ष झाला. झालेल्या निवडणुकीत इंदिरा गांधींचा पराभव झाला पण त्या डगमगल्या नाहीत. आणि राजकारण पुढे चालू ठेवलं. पक्षातून निष्कासित झाल्यावर त्यांनी १९७८ साली स्वतंत्र पक्ष काढला. त्याला निवडणूक आयोगाची मान्यता घेतली आणि त्याचे नाव होते राष्ट्रीय काँग्रेस आय ( इंदिरा काँग्रेस) आणि २०१४ च्या निवडणुकांपर्यंत सर्व निवडणुका काँग्रेस आय म्हणूनच लढविल्या गेलेल्या होत्या. या संघर्षाच्या काळामध्येही विरोधकांकडून इंदिरा गांधींच्यावर जे आरोप केले जात होते तेच आरोप आज मोदींवर केले जात आहेत. इंदिरा गांधी आणि मोदी या दोघांमधला हा समान दुवा आहे. इंदिरा गांधींवर आरोप करणारे आणि मोदींवर आरोप करणारे जवळ जवळ एकच आहेत. पक्ष वेगळे आहेत. इंदिरा गांधींवर हुकूमशाहीचा आरोप करणारे भाजप- समाजवादी होते तर मोदींवर हुकुमशाहीचा आरोप करणारे काँग्रेस-राष्ट्रवादी-समाजवादी इ. पक्ष आहेत. पक्ष बदलले, नेते बदलले आरोप तेच राहिले. अर्थात या हुकुमशाही शब्दाला काही अर्थ आहे, असे मला वाटत नाही. कारण भारतीय राज्यघटना इतकी प्रबळ आहे की या देशात सशस्त्र क्रांती वगैरे कधीही होऊ शकणार नाही. म्हणजेच कोणी एक नेता हा हुकूमशहा बनू शकणार नाही. राजकारणात वापरला जाणारा 'हुकुमशहा' हा शब्द तोडीला 'लोकशाही' हा शब्द खऱ्या अर्थाने इतका रूजलेला आहे की लोकशाहीला हुकुमशाही हा पर्याय होऊ शकत नाही. परंतु विरोधासाठी बोलण्याकरता काहीतरी नवीन शोधावे लागते. जे एकेकाळी इंदिरा गांधींच्या बाबतीत वापरले गेले तेच शब्द आज मोदींच्या बाबतीत वापरले जात आहेत. इंदिरा गांधी लोकशाही नष्ट करणार आणि आज मोदी लोकशाही नष्ट करणार, असे बोलले जात आहे. मात्र असे बोलणारे संपले पण राजकारण स्थिर राहिले. आज आपण प्रामुख्याने दोन परस्पर विरोधी विचारसरणी असलेल्या या दोन नेत्यांमधील समान गुण आणि समान चुका शोधण्याचे प्रयत्न करत आहोत.

इंदिरा गांधी या पत्रकार परिषदेपेक्षा सरळ लोकांशी संवाद साधत. सभांमधून आपले विचार मांडत. मोदी सरळ लोकांशी संवाद साधतात. पत्रकार परिषदेच्या भानगडीत पडत नाहीत. इंदिरा गांधींच्या आणीबाणीनंतर इंदिरा गांधी पुन्हा निवडून आल्या. त्यांनी २० कलमी कार्यक्रम दिला. 'गरिबी हटाव' हा उद्देश होता. आज जे लोक मोदींचे कौतुक करतात ते त्यावेळेला इंदिरा गांधींच्या विरोधात बोलत होते. 'गरीबी हटाव' यापेक्षा 'गरीब हटाव' हा कार्यक्रम होता, असे विरोधक म्हणायचे. परंतु २० कलमी कार्यक्रमाद्वारे सामान्य माणसाचा विचार केंद्रित होऊन इंदिराजी पुढे जातच राहिल्या. आज मोदी सरकार २०१४ पासून विविध योजना राबवित आहेत. त्या योजनांमध्ये मोफत धान्य देण्याची योजना, या गरीबांना सहाय्य करणाऱ्या योजना आहेत. इंदिरा गांधींनी बँकांचे राष्ट्रीयकरण केले म्हणून आपण आज बँकेकडून कर्ज घेऊ शकतो. याचा फायदा मोदींनी आज घेतला. इंदिरा गांधींच्या या नवीन उपक्रमामुळे काही लोक असमाधानी झाले. इंदिरा गांधींच्या विरोधात गेले. कारण अर्थपूर्ण बोलणी करण्याचे त्यांचे मार्ग खुंटले. आज मोदींनी अनेकांचे पैसे सरळ बँक खात्यात जमा करायला सुरूवात केल्यामुळे ज्यांना फायदा व्हायला हवा त्या लाभधारकांपर्यंत पैसे पोहोचले. दोघांच्याही कामातील हा समान धागा आहे. इंदिरा गांधींच्या कालखंडात स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती त्यांनी करून दाखवली. वाजपेयी सारख्या महान नेत्याने इंदिराजींना दुर्गामातेची उपमा दिली. मोदी सरकारने काश्मीरचे ३७० कलम हटवले. राम मंदिराची बांधणी पूर्ण केली. मध्यंतरीच्या काळात सर्जिकल स्ट्राईकही केले. विरोधक टीका करत होते. पण त्यांनी माघार घेतलेली नव्हती. दोघांचेही नाव आज त्यांनी केलेल्या कार्याशी निगडीत झालेले आहे.

**प्रा. श्रीकांत बेडेकर**

दोघांमधील आणखी एक समान गुण इंदिरा गांधी काय किंवा मोदी काय दोघेही फारशी चर्चा न करता आपला निर्णय, आपला कार्यक्रम अचानक जाहीर करून टाकतात. आणिबाणीची कल्पना कोणालाही नव्हती असे म्हणतात. तसे ३७० कलम हटवणे कोणालाही माहीत नव्हते, असे म्हणतात. मात्र या दोघांचाही फायदा देशाला झाला आहे. दोघांचीही कार्यपध्दती, विचारसरणी वेगळी असूनही एकसारखी असल्याचे दिसून येते. दोघांकडूनही काही चुका निश्चितच घडत आहेत. पण त्यांच्याकडूनच घडतात, असे मात्र सरळ म्हणता येणार नाही. उदा.- आणीबाणीमध्ये अनेकांना अटक केली गेली. स्थानिक पातळीवर जे एकमेकाचे द्वेष होते त्यातून ही अटक झाली आणि मोदींच्या काळातही विविध प्रकारचे छापे जे पडत आहेत ते लोकांनी केलेल्या तक्रारीनुसारच आहेत. तक्रार करणारे मोदींच्या बाजूचे असतील पण कार्यक्रम सुरू झाला अनेकांना त्याचा त्रास झाला. दोन्ही वेळेला अटक ज्यांना झाली त्यामध्ये समान गुण असा आहे की स्थानिक पातळीवरून परस्परातील द्वेष भावनेने केलेल्या तक्रारींचा तो परिणाम होता. इंदिरा गांधींच्या लक्षात ही गोष्ट आल्याबरोबर अटक केलेल्यांना सोडून देण्यात आले. आता ज्या धाडी पडत आहेत, चौकशीअंती त्याचाही निकाल २०२४ नंतर लागू शकेल. कदाचित आणीबाणीमध्ये अटक केलेल्यांची चूक जशी इंदिरा गांधींच्या लक्षात आली. तशीच विविध धाडीत झालेली चूक मोदींच्याही लक्षात येईल.

१९६९ ते ८४ या कालखंडावर पूर्णत: इंदिरा गांधींची छाप होती. लोकांच्या हृदयात इंदिरा गांधी वसलेल्या आहेत आणि आजही त्यांच्या कर्तृत्वाचे कौतुक केले जात आहे. दुर्दैवाने आजच्या काँग्रेसमध्ये अनेकजण हे इंदिराजींच्या काळात इंदिरा विरोधी होते. त्यांच्या हातातून काँग्रेस गेली आणि म्हणून लोकमानसातून त्यांची प्रतिमा ही खाली खाली गेली. उदा. २०१४ साली इंदिरा काँग्रेस म्हणून विधानसभेच्या निवडणुका लढल्या गेल्या जवळ जवळ ७७ जागा विधानसभेच्या जिंकल्या. दुर्दैवाने २०१९ मध्ये इंदिराजींचे नाव पक्षाच्या नावातून वगळले गेले आणि अवघ्या ४०-४५ जागा जिंकता आल्या. लोकसभेत एकमेव खासदार निवडून आला. (धानोरकर) तो पूर्वाश्रमीचा शिवसेनेचा होता. ही अधोगती का झाली?

एका किर्तनात एक भजन म्हटले गेले, 'हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा, पुण्याची गणना कोण करी' त्यानंतर एकाने मला नवीन भजन सुचवले आणि तो असे म्हणाला, 'मोदी मुखे म्हणा मोदी मुखे म्हणा, विकासाची गणना कोण करी' । आज तरी मोदींशिवाय पर्याय दिसत नाही. जसा १९८४ सालापर्यंत इंदिरा गांधींशिवाय पर्याय नव्हता. इंदिरा गांधींच्या काळात सर्व विरोधक एकत्रित येऊन जनता पक्ष झाला मोदींच्या काळात सर्व विरोधकांनी एकत्रित येऊन इंडिया आघाडी स्थापण्याचा प्रयत्न केला जो पूर्णपणे फसलेला आहे. कारण मोदींच्या जागी कोणाला आणायचे? यासाठी डझनभर नावे पुढे येतात आणि कोणी कोणालाच सहकार्य करत नाही आणि दुसरीकडे मोदी हे एकच नाव येतं ज्याला पर्याय दिसत नाही. निवडणुकीत जागा कमी जास्त होणे हे अपरिहार्य असते. पण सत्ता कोणाची येणार? हे सांगणं फारसं अवघड नसतं. या विश्लेषणावरून एक गोष्ट नक्की कळाली की या २०२४ च्या निवडणुकीत एकाच नेतृत्वाखाली असलेला हा मोदींचा पक्ष पुन्हा सत्तेवर येईल तर इंडिया आघाडीत एकमेकांना पाडण्याचा कारभार निश्चितपणे केला जाईल. यालाच आधुनिक जगात 'राजकारण' म्हणतात. या सर्व घटनांच्याकडे सामान्य मतदार निदान आज तरी एका तटस्थ भूमिकेतून पाहताना दिसतोय. आता निवडणुकांची सुरूवात होत आहे. वातावरण कमी जास्त होत राहील आणि त्यावरून ४ जून रोजी खरे चित्र समोर येईल. लोकशाही-हुकुमशाही हे शब्द हळूहळू कालबाह्य होतील आणि मोदींचा प्रभाव पाहिल्यावर आज जसे अनेक विरोधक भाजप - शिंदे गट, अजित पवार गटात प्रवेश करत आहेत. तसाच प्रवेश विधानसभेच्या आधी अन्य विरोधी पक्षांकडून केला जाईल आणि विरोधकांना काही वेळेला योग्य उमेदवार शोधणे सुध्दा अवघड होऊन बसेल.

प्रभू रामचंद्र यांच्या मंदिर बांधणीनंतर रामाच्या नावाने का होईना मत मिळतात हे समजलं आणि एका नवीन चर्चेला सुरूवातही झाली. काळ हळूहळू बदलत जातो नवीन पिढी येते ती कोणाच्या प्रभावाखाली जाईल, हे त्या त्या काळानुसार ठरवता येईल. सर्वजण त्या दृष्टीने प्रयत्नशील आहेत आणि सामान्य मतदारांची भूमिका मात्र आम्हाला बरे दिवस येऊ द्या, राज्य कोणीही करा, हेच दिसून येत आहे. म्हणून आपण एकच प्रार्थना परमेश्वराला करू, ' हे परमेश्वरा.. सामान्य कष्टकरी यांच्या जीवनामध्ये आनंदाचे पर्व लवकर येऊ दे'. आपण याचा विचार करावा, हीच भावना.

**जय हिंद जय महाराष्ट्र**

PDF Compressor Free Version



# दादा चौधरीमधील धमाल उन्हाळी छंद वर्गाचा समारोप



समाचार/नगर-दि.६

विद्यार्थ्यांना अभ्यासात गुंतून न ठेवता आनंददायी शिक्षण द्यावे. सततच्या अभ्यासाने मुलांवर अभ्यासाचा ताण येतो. मुलांना वेगवेगळ्या खेळण्यातून, कृतीतून शिक्षण द्यावे. उन्हाळी शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव दिला जातो. दादा चौधरी मराठी शाळेत चांगल्या प्रकारे धमाल छंद वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. डिसेंबर महिन्यातही अशा प्रकारे शिबिर घ्यावे, अशी मागणी विद्यार्थ्यांनी करावी, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे कार्यकारणी सदस्या प्रा.ज्योतीताई कुलकर्णी यांनी केले.

हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी मराठी शाळेत तीन वर्ष ते दहा वर्षे वयोगटातील मुलांसाठी धमाल उन्हाळी छंद वर्गाचा समारोप उत्साहात झाला. महाराष्ट्र बालक मंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना गिरी व विश्रामबाग शाळेच्या बालवाडी विभागाच्या पर्यवेक्षिका वर्षा चिखले यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, दादा चौधरी विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापिका नंदा कानिटकर, मेहेर इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका प्रा.अनुरीता झगडे, दिलीप परसपाटकी आदि उपस्थित होते. अजित बोरा यांचे भाषण झाले. धमाल छंद वर्गात अकरा दिवसात शिकवलेल्या उपक्रमापैकी नृत्य सादरीकरण दोन गटात करण्यात आले. अनुष्का चंगेडिया या विद्यार्थिनीने भरतनाट्यम नृत्य सादर केले. आर्या उपरे, रचना कनोरे, सारंगा कुलकर्णी, गौरव बेद्रे, शेळके या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक सुभाष येवले यांनी के. शाळेचे अध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांच्या मार्गदर्शनाखाली छंद वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

# खुल्या बुद्धिबळ स्पर्धेच्या चौथ्या फेरीला प्रारंभ

समाचार/नगर-दि.६



शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन आयोजित अखिल भारतीय खुली बुद्धिबळ स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव व न्यायाधीश भाग्यश्री पाटील यांच्या हस्ते चौथ्या फेरीची सुरुवात करण्यात आली. यावेळी बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट, ज्येष्ठविधीतज्ञ शिर्के, विश्वस्त पारुनाथ ढोकळे, खजिनदार सुबोध ठोंबरे, श्याम कांबळे, संजय खडके, प्रकाश गुजराथी, दत्ता घाडगे, नवनीत कोठारी, देवेंद्र ढोकळे, सुनील जोशी, अनुराधा बापट, डॉ.स्मिता वाघ, रोहिणी आडकर, पंच प्रवीण ठाकरे आदींसह खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव न्यायाधीश भाग्यश्री पाटील म्हणाल्या की, जिल्हा बुद्धिबळ संघटनेने अतिशय उत्कृष्ट दर्जाची ही बुद्धिबळ स्पर्धा आयोजित केली असून या स्पर्धेला मिळालेला सहभाग पाहता या स्पर्धेमुळे मोठ्या व लहान खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल. या खेळामुळे बुद्धीला चालना मिळणार आहे.

# फुटबॉल स्पर्धेसाठी जिल्हा निवड चाचणीला प्रारंभ

समाचार/नगर-दि.६



अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय सब ज्युनिअर मुलांच्या फुटबॉल स्पर्धेसाठी जिल्हा निवड चाचणीला सोमवार (दि.०६ मे) भुईकोट किल्ला मैदान येथे प्रारंभ झाला. या निवड चाचणीद्वारे जिल्ह्याचा संघ निवडला जाणार असून, या निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी फुटबॉल संघ व खेळाडूंना सीआरएस नोंदणी करुन सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

असोसिएशनचे सचिव रोनप लेक्स फर्नांडिस यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंची निवड होणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, त्यांना जॉय जोसेफ व राजू पाटोळे प्रशिक्षण देणार आहे. २० मे रोजी जिल्ह्याचा संघ जाहीर होणार असून, यामध्ये १८ खेळाडूंचा समावेश असणार आहे.

२३ ते २९ मे दरम्यान शिरपूर (जि. धुळे) येथे जिल्ह्याचा संघ राज्यस्तरीय सब ज्युनिअर मुलांच्या फुटबॉल स्पर्धेसाठी पाठविण्यात येणार आहे. जिल्ह्याचा संघ निवडीसाठी अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड चाचणी होत आहे. यामध्ये १ जानेवारी २०११ ते ३१ डिसेंबर २०१२ दरम्यान जन्मलेल्या मुलांना सहभागी होता येणार आहे. निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी नोंदणी करणे आवश्यिक असून, सीआरएस नोंदणी न केलेल्या खेळाडूंना निवड चाचणीत खेळता येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# स्वामी समर्थांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह



समाचार/नगर-दि.६

श्री स्वामी समर्थची १४६ वी पुण्यतिथी निमित्त सावेडीतील गायकवाड कॉलनी येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने अखंड नाम जप यज्ञ सप्ताह व गुरू चरित्र पारायण आयोजित केले होते. यावेळी महाआरती करून महाप्रसादाने या सप्ताहाची सांगता करण्यात आली. अशी माहिती चॅरिटेबल ट्रस्ट वतीने देण्यात आली. सप्ताहात धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी पुरुष व महिला भविक मोठया संख्येने उपस्थित होते.

# आरईसीने घोषित केला १४,०१९ करोडचा निव्वळ नफा




विद्युत पुरवठा क्षेत्रातील सार्वजनिक महारत्न कंपनी आरइसीने ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या चालू आर्थिक वर्षाचे आर्थिक निकाल नुकतेच एका पत्रकार परिषदेत घोषित केले. आरइसीचे व्यवस्थापकीय संचालक विवेक कुमार देवांगन यांनी कंपनीच्या बोर्डाच्या वतीने हे निकाल घोषित केले. या आर्थिक निकालानुसार कंपनीचा यंदाच्या तिमाहीचा निव्वळ नफा हा १४,०१९ करोड इतका नोंदवला गेला आहे. तर त्रैमासिक स्टण्ड लोन ३४ टक्क्यांनी वाढून ४.६ करोड पर्यंत पोहचला आहे. कंपनीच्या महसुलात २५ टक्के वाढ होऊन हा महसूल १२,६१३ करोड झालेला आहे. कंपनीचे एकूण उत्पन्न १२,६१३ करोड झालेले आहे. कंपनीच्या निव्वळ व्याजावरील उत्पनात २९ टक्के वाढ होऊन हे उत्पन्न ४,४०७ करोड नोंदविले आहे. निव्वळ नफा ४,०१६ करोड नोंदवला गेला आहे जो मागील वर्षीच्या पहिल्या तिमाहीत ३००१ करोड होता. इल्डमध्ये १०.०३ टक्के वाढ आहे. निव्वळ व्याजाची मर्यादा ३.६० टक्के नोंदविली गेली आहे. कंपनीने मागील आर्थिक वर्षात ३,५८,८१६ करोड इतकी कर्ज मंजूर केली असून मागील वर्षात ही कर्ज २,६८,४६१ करोड इतकी मान्य केली गेली होती. कंपनीने सौर प्रकल्पाकरिता २०,९५६ करोड, मोड्युल निर्मितीकरिता २१,५६५ करोड, उच्च हायड्रो प्रकल्पाकरिता ३२,४५० करोड, हरित ऊर्जा प्रकल्पाकरिता ७,९९७ करोड मंजूर केले आहेत.

# रुशीलचे २०२४ चे आर्थिक वर्षाचे निकाल ९ मे रोजी होणार जाहीर

रुशील डेकोर लिमिटेड (बीएसई ५३३४७०, एनएसइ RUSHIL) शाश्वत MDF आणि लॅमिनेटच्या अग्रगण्य पुरवठादारापैकी एक असलेल्या कंपनीने जाहीर केले आहे की कंपनीचे बोर्ड ऑडिट केलेले आर्थिक निकाल जाहीर करण्यासाठी आणि रेकॉर्ड करण्यासाठी ९ मे २०२४ रोजी बैठक घेणार आहे. याच बैठकीत ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील चौथ्या तिमाहीचे आणि ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी कंपनीच्या इक्विटी शेअर्सवरील लाभांशाच्या शिफारशीच्या प्रस्तावावर विचार होणार आहे.

RUSHIL DECOR LIMITED — WE'LL MAKE IT

तत्पूर्वी, कंपनीने सांगितले की, पुढील ३-४ वर्षात कंपनीची निर्यात खछठ ५०० कोटी पर्यंत दुप्पट करण्याची योजना आहे. कंपनी लॅमिनेट प्रकल्पाची सुरवात आणि परदेशात मूल्यवर्धित उत्पादनांचे प्रमाण वाढविणारा समन्वयात्मक धोरणाचा लाभ घेत आहे. डिसेंबर महिन्यात कंपनीच्या कर्नाटकातील चिकमंगळूर प्लॅन्टने केवळ आतापर्यंतचे सर्वोच्च विक्रीचे प्रमाणच गाठले नाही तर क्षमता वापरात कंपनीने १२० टक्केच्या पुढे जाऊन अपवादात्मक कार्यक्षमतेचे प्रदर्शन केले आहे. रुशील डेकोरच्या इको फ्रेंडली MDF सेगमेंटने मूल्यवर्धित उत्पादनासह एक उल्लेखनीय टप्पा गाठला आहे. मूल्याच्या दृष्टीने ज्याची टक्केवारी ५२ टक्के आहे. यंदाच्या आर्थिक वर्षात टक्केवारी ५५ पर्यंत वाढविणायचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. या लक्षित दृष्टिकोनाचा त्याच्या एकूण प्राप्तीवर लक्षणीय सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा आहे. १९९३ मध्ये स्थापित रुशील डेकोर ही कंपनी पायाभूत सुविधांमध्ये जागतिक स्तरावर अग्रगण्य अशी कंपनी असून कंपनीकडे ३.४९ दशलक्ष लॅमिनेटची वार्षिक क्षमता असलेले ५ अत्याधुनिक उत्पादन कारखाने आहेत. मागील आर्थिक वर्षात कंपनीने ८३८.४ कोटी आणि ७७.७ कोटीचा व्यवसाय केला आहे.

# सर्वेश्वर फूड्सचा जम्मू काश्मीरात मोफत मसुरी भात बियाणे वितरण उपक्रम




सर्वेश्वर फूड्स लिमिटेड कंपनीने जम्मू आणि काश्मीर केंद्रशासित प्रदेशातील शेतकऱ्यांना उच्च दर्जाच्या आणि उत्पादन क्षमतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या प्रमाणित सोना मसुरी भाताच्या बियांचे मोफत वाटप करून त्यांना पाठिंबा देण्याच्या उद्देशाने एक अग्रगण्य उपक्रम जाहीर केला आहे. सर्वेश्वर फुड्सने निर्यात केंद्रित तांदूळ वाणांचे बियाणे प्रदान करून शेतकरी समुदायाचे सक्षमीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या कार्यक्रमांतर्गत सर्वेश्वर खरेदी सुविधा केंद्रात सोना मसुरी धानाचे प्रमाणित बियाणे मोफत वाटप करण्यात येणार आहे. हा उपक्रम सर्वेश्वर फुड्सचे स्थानिक शेतकरी समुदायांचे सक्षमीकरण आणि परिसरातील कृषी विकासाला चालना देण्याचे समर्पण प्रतिबिंबित करतो.

जम्मू आणि कश्मीरमधील शेतकऱ्यांसमोरील आर्थिक आव्हानाच्या पार्श्वभूमीवर सर्वेश्वर फूड्स लिमिटेडचे अध्यक्ष रोहित गुप्ता यांनी हा दातृत्वाचा उपक्रम सुरु केला आहे. कृषी तज्ज्ञ संघाच्या देखरेखीखाली सर्वेश्वर फुड्सने भात बियाणे मोफत वाटप करण्याचा संकल्प केला आहे. हे वितरण विशेषतः जम्मूमधील गैर बासमती उत्पादक क्षेत्रांना लक्ष करणार आहे. या कार्यक्रमाचे प्राथमिक उद्दिष्ट शेतकऱ्यांचे कल्याण आणि राज्यातील हितसंबंधांना प्राधान्य देऊन त्यांना पाठिंबा देणे हे आहे. सोना मसुरी तांदूळ हा मुख्यतः दक्षिण भारतात पिकवल्या जाणाऱ्या मध्यम धान्य तांदळाचा एक प्रकार आहे.

सोना मसुरी तांदुळाच्या वैशिष्ट्यापैकी एक म्हणजे त्याची चव आणि सहजपणे शोषून घेण्याची क्षमता आहे ज्यामुळे ते विविध भारतीय पदार्थ तयार करण्यासाठी एक आदर्श घटक आहे. हा तांदूळ ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्याने मधुमेहींसाठी उत्तम पर्याय आहे. कथुवा स्केटरमधील परागवाल, मीरपूर, गरखल, अखनूर पूर्व, पंजतूत, कौर, जोऊरीण, बकोर, हमीरपूर, पाहारपूर, हरिपूर चंडवाल, महाराजपूर याच विविध क्षेत्रातील सुमारे १००० शेतकऱ्यांना या मोफत वितरणाचा फायदा होणार आहे.

# 'सस्टनेबिलिटी स्टडी'चे मुंबईत अनावरण

एसएपी नाऊ (SP Now) या २००० हून अधिक प्रतिनिधींनी उपस्थिती दाखवलेल्या प्रमुख ग्राहक इव्हेण्टमध्ये एसएपीने नवीन 'सस्टेनेबिलिटी स्टडी'चे अनावरण केले. या स्टडीमधून निदर्शनास येते की ८६ टक्के भारतीय कंपन्या स्थिरता आणि त्यांच्या कंपनीचा नफा यामधील प्रबळ संबंधाला पुरेसे प्राधान्य देतात, परिणामत: त्यांच्या गुंतवणुकांमध्ये वाढ करत आहेत. या सर्वेक्षणामधील निष्पत्तींबाबत मत व्यक्त करत एसएपी एशिया पॅसिफिक जपानचे अध्यक्ष पॉल मॅरिएट म्हणाले, ''आशियाई बाजारपेठेचे उत्सर्जनाचे प्रमाण जगामध्ये ५० टक्क्यांहून अधिक आहे. म्हणून प्रांतामधील नाविन्यता व आर्थिक क्रियाकल्पांचे झपाट्याने विकसित होणारे केंद्र म्हणून भारत हवामान बदलाविरोधात कृतींचे नेतृत्व करण्यामध्ये अग्रस्थानी आहे. प्रेरणादायी बाब म्हणजे अधिकाधिक भारतीय कंपन्यां नी ही बाब ओळखली आहे आणि त्याचा अंगिकार करण्यास सज्ज आहेत.'' एसएपी इंडियन सबकॉन्टिनण्टचे अध्यक्ष व व्यावस्थापकीय संचालक मनिष प्रसाद म्हणाले, ''आज स्थिरता नैतिक कर्तव्यापेक्षा व्यवसायाची गरज बनली आहे. यापुढे कंपनीच्या एकूण आर्थिक कामगिरीमध्ये स्थिरतेला अधिक प्राधान्यन दिले जाण्यारची शक्यता आहे. आमच्या स्टडीच्या निष्पयत्तींमधून निदर्शनास येते की, स्थिरतेला प्राधान्य देणारे व्यवसाय अधिक यशस्वीन ठरतात.''

लोकार्थ

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

## शब्दखेळ - १६३

खाली दिलेल्या चौकोनात तांदुळाचे दहा प्रकार लपलेले आहेत. शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बां | चं | का | ळा | खी | अ | क्ष | त |
| बू | झा | ळ | गा | इं | द्र | प | प |
| न | बां | टा | क्ष | द्रा | ष्टी | र | कि |
| त | बा | ल | गी | य | के | भ | री |
| ने | ड | र | ता | णी | अं | घ | न |
| मो | जं | ग | ली | ग | ल | मे | ती |
| ग | क | ला | वा | चौ | क्ष | ली | सो |
| रा | आ | बो | रि | या | क | री | ना |

## शब्दखेळ - १६२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बा | क | तू | का | रा | म | वा | हा |
| जी | औ | आ | जा | द | आ | जॅ | त |
| ग | जा | श्व | क | का | क्रो | ग | क |
| र | र | ना | र | दे | श | फू | डी |
| क्ता | म | ड | सो | पा | न | भा | ळा |
| आ | ना | जा | खु | शी | ह | र | मे |
| ग | सा | जा | न | व | र | द | खा |
| ज | ना | बा | ई | हिं | म | त | चो |

PDF Compressor Free Version



## दिलीप सातपुते; प्रभाग नऊमध्ये प्रचार फेरी

# विकासकामांमुळे जनता विखेंच्या पाठीशी

**समाचार/नगर-दि.६**



खा.सुजय विखे यांनी गेल्या पाच वर्षात शहरात व मतदारसंघात करोडो रुपयांचा विकासनिधी आणून अनेक मोठे विकासकामे मार्गी लावत मतदारसंघाचा विकास केला आहे. विकासकामांमुळे जनता त्यांच्या बरोबर आहे. त्यामुळे या निवडणुकीत खा.सुजय विखे हे ५ लाख मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास शिवसेनेचे शहरप्रमुख दिलीप सातपुते यांनी व्यक्त केले.

लोकसभा निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार खा.डॉ.सुजय विखे यांच्या प्रचारासाठी प्रभाग निहाय घर चलो अभियाना अंतर्गत रविवारी सायंकाळी शहर उपाध्यक्ष धनंजय जाधव यांच्या प्रभाग ९ मधील भागात प्रचारफेरी काढण्यात आली. यावेळी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड.अभय आगरकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबूशेट टायरवाले, मनसेचे जिल्हाप्रमुख सचिन डफळ, भाजपा सरचिटणीस प्रशांत मुथा, उपाध्यक्ष सचिन पारखी, मनसेच्या महिलाध्यक्षा अनिता दिघे, वसंत लोढा, गजेंद्र राशिनकर आदींसह मोठ्या संख्येने महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी धनंजय जाधव म्हणाले, लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीचे उमेदवार खा.डॉ.सुजय विखे यांना विजयी करण्यासाठी महायुतील सर्व घटकपक्ष उत्साहात प्रचार करत असून सर्व भागांमध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद प्रचार फेऱ्यांना मिळत आहे. प्रभाग ९ मधील भागातून त्यांना सर्वात मोठा लीड आम्ही मिळवून देणार आहोत. पंडित वाघमारे, प्रिया जानवे, अनिता दिघे आदींनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी राजू सातपुते, किरण दाभाडे, पोपट पाथरे, अक्षय गांधी, विकास घोरपडे, बाबासाहेब सानप, राहुल रासकर, बाळासाहेब भुजबळ, संतोष शिरसाठ, ज्ञानेश्वर काळे, राजेंद्र काळे, राहुल मुथा, सुरेखा विद्ये, सौ.भांगे, शशीकांत पालवे, मयूर बोचूघोळ, भैय्या परदेशी, सुमित बटूळे, स्वप्नील बेद्रे, गोपाल वर्मा, रणजीत परदेशी, सुनील सकट आदींसह मोठ्या संख्येने महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## इको प्लास्टच्या दर्जेदार उत्पादनांचे सादरीकरण

**समाचार/नगर-दि.६**

नगरमधील नमोह असोसिएटस् कंपनीकडून इको प्लास्ट ब्रॅण्डच्या नावाने बांधकामासाठी उपयुक्त दर्जेदार उत्पादनांची निर्मिती केली जाते. नदीच्या वाळूपासून सदर उत्पादने तयार केली जातात. यामुळे बांधकामाचा दर्जा, आयुष्य वाढण्यास मदत होते. इंटेरियर डिझायनर असोसिएशन व इको प्लास्ट यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात कंपनीने इको प्लास्ट स्कटिंग मॉरटर या नवीन उत्पादनाचे लाँचींग केले आहे.

या कार्यक्रमास इको प्लास्टचे सुयोग चोपडा, आकाश कुमट, विवेक जैन, हावीर हिरण, ललित जैन, इंटेरियर डिझायनर असोसिएशनचे



अध्यक्ष सागर कंदूर, उपाध्यक्ष चेतन वाडेकर, सचिव ब्रजेश शहा, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटेरियर डिझायनरचे अध्यक्ष अजय अपूर्व, आर्किटेक्ट असोसिएशनचे प्रल्हाद जोशी, उमेश जाजू, विनायक घोसके आदींसह इंटेरियर डिझायनर, आर्किटेक्ट उपस्थित होते.

सुयोग चोपडा यांनी सांगितले की, बांधकाम करताना नदीच्या वाळूला खूप महत्व असते. अनेकदा वाळू मिळवताना अडचण येते. हीच गोष्ट लक्षात घेवून इको प्लास्टने नदीच्या वाळूपासून उत्पादने तयार केली आहेत. अनेक ग्राहकांनी त्याचा वापर केला असून टिकाऊपणा अनुभवला आहे. लाईट वेट ब्लॉक बांधकामसाठी वापरण्यात येतात, नदीच्या वाळूचे प्लास्टर करायचे असेल तर इको प्लास्ट वापरणे उपुयक्त ठरते. टाईल्स लावण्यासाठी उच्च दर्जाचे केमिकल, भिंत व जमिन जॉइंटवर अनेकदा लिकेज होते. तो कमी करण्यासाठी इको प्लास्ट स्कटिंग मॉरटर उपयुक्त ठरणार आहे. स्कटिंग मॉरटर बनविणारी इको प्लास्ट ही महाराष्ट्रातील पहिली कंपनी आहे.

## आर्ट असोसिएटच्या विक्रमात भार्गवी होंडे हिचा सहभाग

**समाचार/नगर-दि.६**

नाशिक येथील आर्ट असोसिएट्स या संस्थेने आयोजित केलेल्या विश्वविक्रमामध्ये ज्ञानसंपदा स्कूलची इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी भार्गवी भारत होंडे हिने सहभाग नोंदवला.

या विश्वविक्रमामध्ये कथ्थक, भरतनाट्यम, ओडिसी, कुचीपुडी, मोहिनी हट्टम, आणि हत्रीय अशा सहा प्रकारच्या शास्त्रीय नृत्याचे एकापाठोपाठ सलग १३ तास ३७ मिनिटे सादरीकरण करून विश्वविक्रमाची नोंद केली. यामध्ये महाराष्ट्रातून विविध गुरुकुलांमधील २८ वेगवेगळ्या समूहातून एकूण ४०४ नृत्य कलाकारांनी सहभाग नोंदवला. नगर मधून कल्याणी कामतकर संचलित कथक नृत्यालयाच्या एकूण ५० शिष्यांमध्ये भार्गवी चा सहभाग होता.



भार्गवी होंडे च्या या यशाबद्दल तिचे संपदा विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण बजाज, विश्वस्त मिलिंद गंधे, अरुण कुलकर्णी, कारभारी भिंगारे, अविनाश बोपर्डीकर व सर्व विश्वस्त. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर व सर्व शिक्षकांनी भार्गवीचे या यशाबद्दल अभिनंदन केले.

## स्मृतीदिनानिमित्त मार्केटयार्ड येथे अभिवादन

# स्व. घुलेंकडून हमालांना न्याय - आरगडे

**समाचार/नगर-दि.६**

कष्टकरी हा समाजाचा कणा आहे आणि तो मजबूत राहिला पाहिजे. यासाठी स्व.शंकरराव घुले यांनी मोठं,मोठं आंदोलने उभे केले. हमाल पंचायतच्या माध्यमातून हमालांच्या पाठीवरचे ओझे कमी करुन खर्या अर्थाने त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. माथाडी कामगारांना त्यांचे हक्क मिळवून दिले. बाजार समितीच्या हमाल-मापाड्यांच्या प्रश्नांसाठी सरकार विरोधात आंदोलन उभे करुन अनेक प्रश्न मार्गी लावले. नगराध्यक्ष, विविध संस्थांचे पदाधिकारी म्हणून त्यांनी आपल्या कार्याने एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचे कार्य आजही सर्वांसाठी दिशादर्शक असेच आहे, असे प्रतिपादन कॉ.बाबा आरगडे यांनी केले.



कष्टकर्यांचे नेते स्व.शंकरराव घुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त मार्केट यार्ड, हमाल पंचायत येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, उपाध्यक्ष गोविंद सांगळे, शेख रज्जाक शेख लाल, सुभाष तळेकर, सचिव मधुकर केकाण, सल्लागार अशोक बाबर, ज्ञानदेव पांडूळे, रविंद्र भोसले, जालिंदर बोरुडे, डॉ. विजय कवळे, लतिफ शेख, रत्नाबाई आजबे, मंदाबाई सूर्यवंशी, लक्ष्मण वायभासे, भगवान सांगळे, भिमराज कांडेकर, संजय वाल्हेकर, गणेश भगत, हरिश्चंद्र गिरमे, विलास कराळे, तारकराम झावरे, सदानंद सोनवणे, अशोक आगरकर, नंदू डहाणे, मच्छिंद्र मालूंजकर, आनंदा शिंदे, आदिनाथ गिरमे, प्रा.सुनिल गोसावी, अजय चितळे आदि उपस्थित होते.

अविनाश घुले म्हणाले, कष्टकरी आणि शंकरराव घुले यांचे अतुट नाते होते. कष्टकर्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी विविध पातळ्यांवर त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या हक्कांसाठी जनआंदोलन उभे करुन विकास साधण्यात आला आहे. कष्टकऱ्यांना स्वत:ची पत निर्माण करण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. त्यांचे विचार आणि कार्य आपण हमाल पंचायतीच्या माध्यमातून पुढे नेत असल्याचे सांगितले. सुभाष तळेकर यांचेही भाषण झाले. यावेळी अनेकांनी स्व.शंकरराव घुले यांच्या आठवणींना उजाळा दिला.

# भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा शुभारंभ

**समाचार/नगर-दि.६**

श्रीमद् भागवत हे मनोरंजनाचे साधन नाही तर मनोभंजनाचे साधन आहे. मनोज कृष्णमय कसे करायचे आहे हे शिकवणारे भागवत आहे. भोगाच्या दिशेने चाललेली दिशा भगवंताच्या दिशेकडे वळविण्यासाठी श्रीमद् भागवत हे शास्त्र आहे. असे निरूपण भागवताचार्य व रामायणाचार्य साध्वी प.पू.अनुराधा दीदी यांनी पहिले पुष्प गुंफताना केले आहे.



पाईपलाईन रोड येथील संत किसनगिरी नगर येथील गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला.याप्रसंगी संत किसनगिरी नगर परिसरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली.श्रीमद् भागवत ग्रंथाचे पालखीत पूजन करून तसेच वारकरी भजनी मंडळ व महिला मंडळ तसेच भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन शोभायात्रा मिरवणूक काढण्यात आली.महिलांनी फुगडीचा फेर धरला,परिसरात ठिकठिकाणी रांगोळ्या काढून शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी भागवताचार्य व रामायणाचार्य साध्वी परमपूज्य अनुराधा दीदी यांची बग्गीतून मिरवणूक काढण्यात आली.याप्रसंगी सद्गुरु किसनगिरी बाबा नगर भक्त मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

## डॉ.कमर सुरूर पुरस्काराने सन्मानित

**समाचार/नगर-दि.६**

शहरातील उर्दू साहित्याला पोषक वातावरण निर्मिती साठी गेली अनेक वर्षे सदैव तत्पर असलेले डॉ. कमर सुरुर उर्दू भाषेचा विकास व्हावा यासाठी सतत प्रयत्नशील असतात. लोकांमध्ये उर्दू भाषेची आवड निर्माण व्हावी आणि उर्दू भाषेचा प्रचार आणि विकास व्हावा यासाठी नेहमी कार्यरत असतात असे प्रतिपादन बंगलोरच्या बज्म-उर्दू साहित्य संस्थेचे सचिव गुफरान अमजद यांनी व्यक्त केले.



डॉ. कमर सुरुर यांच्या सेवेची दखल घेऊन त्यांना बज्मे उर्दू बैंगलौर तर्फे २०२४ सालचा साहित्य पुरस्कार मलिका-ए- सुखन देऊन गौरविण्यात आले.

त्यानिमित्ताने बज्मे उर्दू बैंगलोर यांच्या तर्फे अखिल भारतीय मुशायरा आयोजित करण्यात आला होता. अलाह बख्श आमरी यांच्या अध्यक्षतेखाली मुशायरा संपन्न झाली.प्रमुख पाहुणे अल्हाज बाबाजी, मोहंमद खुर्शीद अक्रम कामली व सय्यद सलीमुद्दीन आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



# निवडणूक निरीक्षकांची हिवरेबाजारच्या कुस्ती आखाड्यास भेट

**समाचार/नगर-दि.६**

नगर दक्षिणचे निवडणूक निरीक्षक अरविंदन तामिळनाडू केडर (I.P.S) यांनी नुकतेच हिवरे बाजारला भेट दिली. पद्मश्री पोपटराव पवार यांनी विविध विकास कामांची माहिती दिली.

अरविंदन म्हणाले, सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मिडीयाचा वापर दिवसेंदिवस वाढत असून त्याचा वापर विधायक कामांसाठी करावा. तरुणाईला योग्य दिशा देण्यासाठी आणि निरोगी व निर्व्यसनी पिढी तयार होण्यासाठी तरुणाईची उर्जा खेळामध्ये खर्च होण्याची गरज आहे.

आदर्श गाव हिवरे बाजार येथील ग्रामदैवत श्री क्षेत्र मुंबादेवी यात्रा उत्सवानिमिताने कुस्त्यांच्या भव्य आखाड्याचा शुभारंभ अरविंदन यांच्या हस्ते करण्यात आला.हिवरे बाजार हे अतिशय कमी पाऊस पडणारे गाव असूनही पद्मश्री पोपटराव पवार यांच्या निस्वार्थी नेतृत्वाखाली ग्रामस्थांचा लोकसहभाग व शासकीय योजना यांच्या समन्वयातून अतिशय दर्जेदार पाणलोट क्षेत्र विकासाचे काम झाले आहे. याप्रसंगी प्रल्हाद गीते छबुराव ठाणगे , रामभाऊ चत्तर, बाबासाहेब गुंजाळ, हरिभाऊ ठाणगे, रोहिदास पादीर, एस.टी.पादीर, अर्जुन पवार, दामोधर ठाणगे आणि गावातील व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निरंजन सेवाभावी संस्थेचा अभिनव उपक्रम

# मुलांनी मनसोक्त घेतला आंब्याचा आस्वाद

**समाचार/नगर-दि.६**

अनेक संस्था समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी काम करत आहेत. अनाथ मुला-मुलींना आधार देण्यासाठी त्यांचे भविष्य घडविण्यासाठी प्रयत्नशिल आहेत. अशा संस्थांना मदतीचा हात देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. याच भावनेतून निरंजन सेवाभावी संस्था काम करत आहे ही कौतुकास्पद बाब आहे. सामाजिक संस्थांतील मुलांना आंबा खाण्याची स्पर्धेचा उपक्रम राबवून त्यांचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न केला आहे. चांगल्या उपक्रमांसाठी समाज नेहमीच सहकार्य करेल. सामाजिक संस्थांच्या उन्नत्तीसाठी प्रत्येकाने आपल्यापरीने वाटा उचलवा, असे प्रतिपादन उद्योजक जितेंद्र बिहाणी यांनी केले.



निरंजन सेवाभावी संस्थेच्यावतीने दरवर्षीप्रमाणे सामाजिक संस्थेतील मुलां-मुलींसाठी आंबे खाण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्रद्धा बिहाणी, मर्चंटस् बँकेचे उपाध्यक्ष अमित मुथा, उद्योजक संजय पुगलिया, सपना आसावा, निलेश बिहाणी, शाम आसावा, गौतम मुनोत, दिनेश भाटिया, राहुल ओझा, भुषण मालू, मनिष सोमाणी, धनेश कोठारी, परेश बजाज, सुबोध काबरा, शाम भुतडा, महेश बिहाणी, निरज काबरा, योगेश बजाज,गणेश बुरा ,सुधीर तावरे आदि उपस्थित होते.

निलेश बिहाणी यांनी प्रास्तविक केले. अतुल डागा यांचे भाषण झाले. निरंजन संस्थेच्यावतीने नेहमीच सामाजिक उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. सन २०२४ असल्यास यंदाच्यावर्षी संस्थेने २०२४ मुला-मुलींचे पालकत्व घेत त्यांच्या सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्याचबरोबरच संस्थेच्या सभासदांच्या आनंदक्षणी मिष्ठान्न भोजन अशा संस्थेतील मुलांना दिले जाते. आजही अशा सामाजिक संस्थेतील मुलांना मनसोक्त आंबे खाण्याचा आनंद मिळवून दिला असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक बंगर्डीवाला परिवार यांनी सहकार्य केले.

### दागिन्यांच्या मजुरीवर १० ते १०० टक्क्यांपर्यंत सवलत

# ए.एच.पोखरणा ज्वेलर्समध्ये वर्धापन दिन व अक्षय्य तृतीयेनिमित्त खास ऑफर



**समाचार/नगर-दि.६**

ग्राहकांचा विश्वास व प्रेम याची जपणूक करीत सुवर्णसेवा देणारे ए.एच.पोखरणा ज्वेलर्स दालन नगर शहराचे वैभव आहे. अक्षय्य तृतीयेचा शुभ मुहूर्त आणि नवीपेठ दालनाच्या वर्धापन दिनानिमित्त सर्जेपुरा आणि नवीपेठ या दोन्ही दालनात खास ऑफर देण्यात आली आहे. यात ग्राहकांना दागिन्यांच्या मजुरीवर १० ते १०० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येणार आहे तसेच प्रत्येक खरेदीवर आकर्षक भेटवस्तू दिले जाणार आहे. डायमंड दागिन्यांच्या मजुरीवर सरसकट १०० टक्के सवलत देण्यात येणार आहे, अशी माहिती अमित पोखरणा व आकाश पोखरणा यांनी दिली.

तब्बल १७ वर्षांची सुवर्ण सेवेची परंपरा असलेले ए.एच. पोखरणा ज्वेलर्स सुवर्ण दालन नेहमीच ग्राहकांचा प्रेम व विश्वास याला महत्त्व देते. नवीपेठेनंतर खास ग्राहकांच्या सोयीसाठी सर्जेपुरा येथे भव्यदिव्य प्रशस्त दालन सुरू करण्यात आले. खरेदीचा चांगला आनंद मिळावा यासाठी मजुरीवर १० ते १०० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येणार आहे.

पोखरणा ज्वेलर्स हॉलमार्क प्रमाणित दागिन्यांसाठी तसेच सर्वात कमी मजुरी दरासाठी परिचित आहे. सोने (दागिने) मोडताना कुठल्याही प्रकारची घट कापली जात नाही. या जोडीलाच आता अधिक लाभाची योजना प्रत्येक ग्राहकासाठी सुवर्णसंधी ठरेल. पोखरणा ज्वेलर्स मध्ये पारंपरिक व अत्याधुनिक ज्वेलरीची मोठी व्हरायटी उपलब्ध आहे. ५ ग्रॅमपासून ते १५० ग्रॅमपर्यंत वजनाच्या दागिन्यांची रेंज येथे आहे. दागिने तसेच हिऱ्यांची अत्युच्च गुणवत्ता याठिकाणी ग्राहकांना मिळते. चांदीचे पैंजण तसेच अन्य दागिने, भेट वस्तू, देवीदेवतांच्या मूर्ती, पूजा साहित्य, चांदीची नाणी दालनात आहेत

याशिवाय सुवर्ण समृद्धी योजने अंतर्गत १२ हप्ते भरल्यास १३ वा हप्ता मोफत दिला जाणार आहे. ९९.५० शुद्धतेचे सोन्याचे नाणे व वेढणी उपलब्ध आहे. योजनेचा ग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन ए. एच. पोखरणा ज्वेलर्सच्यावतीने करण्यात आले आहे.

### प्रवीणऋषीजी महाराज यांची बोरा यांच्या निवासस्थानी आशीर्वादपर भेट

# साधूसंतांची कृपादृष्टी मिळणे ही खरोखरच भाग्याची गोष्ट : बोरा





**समाचार/नगर-दि.६**

नगर ही संतांची भूमी आहे. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांनी या भूमीत मानव कल्याणाची शिकवण दिली. तोच विचार आचार्यश्रींचे सुशिष्य प्रविणऋषीजी महाराज पुढे नेत आहेत. सन २००९ मध्ये त्यांचा चातुर्मास नगरला झाला होता. आज अनेक वर्षांनी गुरू महाराज नगरला आल्याने खूप आनंद झाला. त्यांचे अनमोल विचार, सान्निध्य आणि आशीर्वाद लाभले. साधूसंतांची कृपादृष्टी मिळणे ही खरोखरच भाग्याची गोष्ट आहे अशा भावना जैन कॉन्फरन्सचे प्रमुख राष्ट्रीय मार्गदर्शक अशोक (बाबूशेठ) बोरा यांनी व्यक्त केल्या.

उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज यांनी नुकतीच अशोक (बाबूशेठ) यांच्या निवासस्थानी आशीर्वादपर भेट दिली. त्यांच्या समवेत तीर्थेशऋषीजी महाराज होते.

यावेळी अजित बोरा, ईश्वर बोरा, विनित बोरा यांच्यासह बोरा परिवारातील सदस्य तसेच उद्योजक मोहनलाल मानधना, डॉ.रमेश कोठारी, सुभाष मुथा, मिनाताई मुनोत, प्रमोद मुनोत, चांदुशेठ मुथा, संपत बोरा, राहुल मुनोत, विनोद मुथा, संतोष गांधी, कमलेश भंडारी, विजय गुंदेचा, संजय बोगावत, ईश्वर मुनोत, सचिन चोपडा, कुणाल भंडारी, प्रतीक बोगावत, मनिष गुगळे, रितेश कोठारी, अनिकेत मुनोत, आनंद भंडारी, अमोल शिंगी, तरुण कराचीवाला, हर्ष बोरा, शेखर गांधी, जैनम बोरा आदींसह श्रावक श्राविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अशोक बोरा पुढे म्हणाले, पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांच्या संकल्पनेतून चिचोंडी येथे भव्य आनंदतीर्थ साकारत आहे. अर्हम विज्ञा अभियानातून मोठे क्रांतीकारी कार्य घडत आहे. बोरा परिवाराने चिचोंडी येथील गुरू आनंद फौंडेशनसाठी देणगी दिल्याबद्दल सुभाष मुथा व मित्र परिवारातर्फे अशोक (बाबूशेठ) बोरा यांचा सत्कार करण्यात आला.

# अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे यश



**समाचार/नगर-दि.६**

पुणे कर्वेनगर येथील महालक्ष्मी लॉन्स येथे जॉब फेअर यशस्वीरीत्या पार पडला. यामध्ये सोनेवाडी रोड येथील अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीच्या २२ विद्यार्थीनी नावनोंदणी केली होती. या फार्मा फेअरमध्ये डी. फार्म द्वितीय वर्षात शिकत असलेल्या ५ मुलांचे वेगवेगळ्या फार्मा कंपनीमध्ये निवड झाली.

आकाश वायकर (जेनरिक प्लस), श्रावणी मुनोत (मेडप्लस), प्रांजल कर्डिले (मेडप्लस) आणि साक्षी पवार (मेडप्लस) या विद्यार्थ्यांची फायनल निकाल लागण्यापूर्वी निवड झाली व बाकी विद्यार्थ्यांची निवड लवकरच होणार आहे.

यावेळी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे मान्यता समिती सल्लागार डॉ. नरेंद्र गोवेकर, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास व रोजगार पुणे विभागाच्या उपायुक्त अनुपमा पवार, तंत्रशिक्षण संचलनालयाच्या पुणे विभागीय कार्यालयाचे सहायक संचालक मारुती जाधव, महाराष्ट्रा फार्मसी कौन्सिलचे अध्यक्ष अतुल अहिरे उपस्थित होते. अरिहंत कॉलेजचे प्रा. स्वप्नील काळे सर (ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर) तसेच कुलदीप सुरडीकर हे उपस्थित होते.

अरिहंत कॉलेजचे प्राचार्य डॉ. योगेश बाफना म्हणाले, अरिहंत कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांची परिपूर्ण तयारी करुन घेतली जात असल्याने शेवटच्या वर्षाचा निकाल लागण्यापूर्वीच जॉबसाठी विविध कंपन्यांना आमंत्रित केले जाते. त्याचबरोबर राज्यस्तरीय जॉब फेअरसाठी मार्गदर्शन केले जात असल्याने कॉलेजचे अनेक विद्यार्थ्यांना जॉब मिळत असल्याचे सांगून विद्यार्थ्यांही या संधीचे सोने करत आहेत. त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रत्येक घटकाचे अभिनंदन करुन विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


**विकणे आहे**

गुलमोहर रोड येथील रोड टच पहिल्या मजल्यावरील १००० स्क्वे. फुटाची वेलफर्निश्ड ऑफिस स्पेस विकणे आहे.

-: संपर्क :-
9011923939

**पाहिजेत**

हेल्पर (जेन्टस्) २

१० वी वयमर्यादा १८वर्षा पुढील
आकर्षक पगार
संपर्क :-
9890027068

**पाहिजेत**

नगर शहरालगत असलेल्या हॉस्पिटलसाठी खालील पदांची अनुभवी/फ्रेश त्वरित भरती करणे आहे.

| पदनाम | पात्रता | संख्या |
|---|---|---|
| M.O. | B.A.M.S. | 4 |
| Nursing Staff | ANM / GNM/B.Sc.Nursing | 10 |
| Consultant | M.D. (Ayu),BAMS | 7 |
| Ward Attendant | 10/12 th Pass | 2 |
| Accountants | B.Com.with Computers Skills | 2 |
| Clerk | Graduation (Any) & Computers Skills | 2 |
| Attendent/Peon | 10 / 12 th Pass | 4 |


इच्छूकांनी त्वरित संपर्क साधावा.
मो.9421518995 / 9028033591

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकामाची रांगोळी

शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०

**विकणे आहे**

चालू स्थितीतील जिम साहित्य त्वरित विकणे आहे.
- संपर्क -
9834448462
9175075992





**घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा**

वृद्धत्व-कॅन्सर-अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना घरच्यासारखी निवासी सेवा - शुश्रूषा. (सशुल्क)

**स्नेहदीप केंद्र**
केडगाव, अहमदनगर
9011020176
9011026483
7499980845
(सहयोग - स्नेहालय)

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दिनांक - ४ मे ते ११ मे २०२४



| | |
|---|---|
| बडे मियाँ छोटे मियाँ | 10.00 PM |
| CREW | 4.10 PM |
| जुनं फर्निचर | 8.00 AM, 2.10 PM, 5.05 PM, 10.35 PM |
| मैदान | 12.45 PM |
| नाच गं घुमा | 8.30 AM, 10.00 AM, 1.45 PM, 4.30 PM, 7.55 PM, 9.45 PM |
| स्वरगंधर्व सुधीर फडके | 11.00 AM, 6.45 PM |
| THE FALL GUY (HINDI) | 11.15 AM, 7.15 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show — CONNPLEX — AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

**UNITED PHARMA**

Pharmaceutical Distributors

Near Kedgaon Ves, Kedgaon

9049934444
7972378081
9822020649




**SASE DCORATERS**



Mandap, Light & Flower Decoraters

Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar
9822331006, 9579544110

